म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : जैन वाङ्मय
दा. क्र. : ३००३
BVBK-0403003

*गुरुने दिला ज्ञानरूपी वसा*
*आम्ही चालवू हा पुढे वारसा*

BVBK-0403003

# अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| १) | अनोखी भेट | ५ |
| २) | पारिजातकाचे फूल | २३ |
| ३) | पारिजात हरण | २९ |
| ४) | सुवर्ण तुला | ३७ |
| ५) | खाशी खोड मोडली | ५० |
| ६) | स्वातंत्र्यप्रीती | ६२ |

# अनोखी भेट

"आम्ही पुत्रधर्माचं पालन करावं की, क्षात्रधर्माचं आचरण करावं? या प्रसंगात पुत्रधर्म आणि क्षात्रधर्म परस्पर विरोधी आहेत. काय करावं आम्ही? आपलं मत हवं आहे."

बभ्रुवाहनाने मंत्रिमंडळाला प्रश्न विचारला, आणि तो अस्वस्थ मनाने, उत्तराची वाट पाहत बसून राहिला.

सेवकांनी श्यामकर्ण अश्वशाळेत बांधल्याची वार्ता ऐकताच तो उत्सुकतेने तेथे गेला होता, पण त्याच्या कपाळावरील सुवर्ण-पत्रिका वाचून मात्र तो अस्वस्थ झाला होता. तेव्हापासून तो विचाराचा गुंता तो सोडवू शकला नव्हता. 'युद्ध करावं की, नजराणा देऊन श्यामकर्ण परत करावा?' या प्रश्नाचे उत्तर त्याला सापडत नव्हते. त्यासाठीच त्याने मंत्रिमंडळाची बैठक बोलावली होती. त्यानेच बोलायला प्रारंभ केला होता.

"आज आम्हाला एका महत्त्वाच्या प्रश्नावर आपला विचार हवा आहे."

"कोणत्या महाराज?"

"आजचा प्रसंग मोठा नाजूक आहे. पांडव अश्वमेध यज्ञ करीत असून त्या अश्वमेधाचा घोडा आपल्या मणिपुरात येऊन थडकला आहे."

"पण महाराज, सेवकांनी तो मघाशीच अश्वशाळेत बांधला आहे."

"म्हणून तर पेच उभा राहिला आहे. यज्ञ पांडवांचा आहे आणि अर्जुन स्वत: घोड्याचं रक्षण करीत आहेत. त्यांच्याशी युद्ध करायचं का?"

"आपण अश्व धरला आहे, तेव्हा अर्जुनाशी युद्ध करायचं,

हेच क्षात्र-धर्माला अनुसरून आहे. महाराज विजयी होतील अशी आम्हाला खात्री आहे."

"ती खात्री आम्हालाही आहे, पण..."

"पण काय महाराज?"

"पित्याशी युद्ध?"

"आं?"

"होय. म्हणून तर प्रश्न नाजूक आहे महामंत्री. अर्जुन हेच माझे पिता आहेत."

"पण आपण कधी..."

"सांगायची वेळच आली नव्हती. आता सांगतो."

असं म्हणून बभ्रुवाहन सांगू लागला-

"माझी आई चित्रांगदा ही एक अप्सरा आहे. पूर्वी इंद्राच्या दरबारात नृत्य करीत असताना तिचा ताल चुकला. इंद्र रागावला आणि त्यानं शाप दिला की तू पृथ्वीवर जन्म घे. माझी आई घाबरली. तिनं उःशाप मागितला, तेव्हा इंद्राने उःशाप दिला. "ज्या पार्थाच्या शौर्यानं आणि सौंदर्यानं मोहित होऊन तू ताल चुकलीस, त्याचेच पाय धर म्हणजे तुझा उद्धार होईल." हा उःशाप ऐकून आईला आनंद झाला. एके दिवशी अर्जुन फिरता फिरता एका सरोवरापाशी आले. तृषा शांत करण्यासाठी ते सरोवरातलं पाणी पिऊ लागले. त्याच सरोवरात माझी आई स्नान करीत होती. तिनं ते पाहिलं आणि पार्थ चरणांना मिठी मारली. पुढं काय झालं ते सांगण्याची आवश्यकता नाही. तुम्ही समजू शकता. माझ्या जन्मानंतर काही काळातच पार्थ हस्तिनापुरास गेले. आई येथेच राहिली. माझं शिक्षण तिनंच केलं. तिनंच सारं महाभारत

मला ऐकवलं. "तू इतका पराक्रमी हो की ह्यांनी तुला 'पराक्रमी' म्हटलं पाहिजे." असं ती नेहमी म्हणते. भारतीय युद्धातच आपला पराक्रम दाखवावा असं आम्हाला वाटत होतं, पण तेव्हा आम्ही लहान होतो, म्हणून आम्हाला असं वाटतं की आपला पराक्रम आता दाखवावा. संधी अनायासे चालून आली आहे. तेव्हा आता आम्ही युद्धात भाग घेऊ इच्छितो."

"छे! महाराज, हे सारं सांगितल्यावर आपण युद्धात भाग घेणार हे आम्हाला योग्य वाटत नाही."

"का?"

"महाराज, आपण पार्थपुत्र. हा आपल्याच घरचा अश्वमेध" तेव्हा पुत्रधर्माचं पालन करायचं का त्यात विघ्न आणायचं?"

हसतच बभ्रुवाहन म्हणाला,

"महामंत्री! मग आम्ही तरी काय म्हणत होतो? आपला सल्ला योग्यच आहे. अहो, आम्ही युद्धात भाग घेऊ इच्छितो म्हणजे आता पिताजींना विश्रांती देऊन श्यामकर्णाचं संरक्षण जातीनिशी आम्ही करावं असं म्हणतो. आपल्या घरच्या यज्ञात ही मदत करायलाच हवी. आम्ही असताना पिताजींना त्रास कशाला?"

"क्षमा असावी महाराज! आपल्या बोलण्याचा हेतू ध्यानी नाही आला. आपलं म्हणणं वीर पुत्राला साजेसं असून क्षात्रधर्मालाही अनुसरून आहे."

"महामंत्री! आमचा विचार ... पण पिताजींना हे पटेल का? ते क्षात्रवीर आहेत. आम्ही त्यांना सामोरे गेलो तर त्यांना आवडेल का? त्यांना हे आवडलं नाही तर...?"

"तेही खरंच!"

"म्हणून तर सारा प्रश्न! इथे पुत्रधर्म आणि क्षात्रधर्म परस्पर विरोधी आहेत. काय करावं आम्ही? आपलं मत हवं आहे."

महामंत्र्यांनी बराच वेळ विचार केला नि मग ते धीरगंभीर आवाजात म्हणाले, "महाराज, हा अश्वमेध आपल्या घरचाच आहे. तेव्हा इथे आपण पुत्रधर्म पाळावा असं आम्हाला वाटतं. इथे शरण जाण्याचा प्रश्न येतच नाही. ही पितापुत्रांची भेट आहे. पित्याची भेट घेण्यात, त्यांना सामोरे जाण्यात वीरपुत्राला काही कमीपणा आहे, असं आम्हाला वाटत नाही."

साऱ्या मंत्र्यांनी महामंत्र्यांच्या सांगण्याला दुजोरा दिला आणि बभ्रुवाहनानेही तो सल्ला मानला.

श्यामकर्ण सजवला गेला, सुवर्णमुद्रा घेतल्या. सारी सिद्धता झाली. बभ्रुवाहन पायी निघाला. अर्जुनाला शरण निघाला, नव्हे पित्याचे चरणरज मस्तकी धारण करायला वीरपुत्र निघाला. एक अपूर्व सोहळा होता तो. त्या वेळी बभ्रुवाहनाच्या चेहऱ्यावर विलक्षण समाधान दिसत होते.

अर्जुनाला निरोप गेला. "मणिपूरचे महाराज बभ्रुवाहन श्यामकर्ण घेऊन भेटीला येत आहेत." अर्जुन सुखावला, इतके दिवस युद्धाने दमलेल्या योद्ध्यांनाही आनंद झाला. युद्ध टळलं म्हणून!

थोड्याच वेळात बभ्रुवाहन आपल्या मंत्र्यांच्यासह अर्जुनाला सामोरा आला. रीतसर खंडणी पुढे ठेवली. हात जोडून उभा राहिला. अर्जुनाचे लक्ष त्याच्या चेहऱ्यावर खिळले होते. गतस्मृतीचे तरंग अंत:करणात उमटत होते. "याला कोठेतरी पाहिला का?" निश्चित उत्तर मात्र सापडत नव्हते. तोच बभ्रुवाहन

नम्रतेने म्हणाला,

"तात, मला ओळखलं नाही. मी..."

"तात ....?"

"होय, तातच, आपण माझे पिताजी आहात. मी बभ्रुवाहन! चित्रांगदेचा मुलगा."

"कोण बभ्रुवाहन ... माझा मुलगा ..."

"होय तात. आपला बभ्रु..."

बभ्रुवाहनाचे शब्द पूर्ण होण्याचे आतच अर्जुनाचा चेहरा बदलला. "आपला मुलगा .. वीर अर्जुनाचा मुलगा आणि शरणागती... ?"

त्याला काही समजेना. तो ताडकन म्हणाला,

"शक्य नाही! माझा पुत्र नि असा भेकड? अशक्य..."

असं म्हणतच अर्जुनाने वाकलेल्या बभ्रुवाहनाच्या मस्तकावर लाथ मारली. तो खाली कोसळला. स्वत:ला सावरून तो पुन्हा उभा राहिला, पण अर्जुनाने लाथ का मारली हे त्याला कळेना. आपला असा कोणता अपराध झाला, हे त्याच्या लक्षात येईना. तो पुन्हा नम्रतेने, शांतपणे म्हणाला,

"तात, आपण का रागावलात? मी भ्याड नाही. मी वीर अर्जुनाचा पुत्र आहे. तो भेकड कसा असेल?"

"मग ही सारी लक्षणं काय तुझ्या शौर्याची आहेत? बांधलेला श्यामकर्ण परत आणणं, ही खंडणी देणं ही कृत्यं तुझ्या शौर्याचेच पोवाडे गात आहेत ना? म्हणे मी भेकड नाही."

"तात, आपला गैरसमज होतोय, पुत्रधर्माचं पालन करण्यासाठी..."

"शरण येणं हा पुत्रधर्म होय? नर्तकीच्या पोरा, असं शरण

येण्यापेक्षा आईच्या नृत्यामागं मृदुंग बडवण्याच्या पुत्रधर्माचं पालन का करीत नाहीस? युद्ध म्हणजे मृदुंग बडवणं नव्हे!"

"नर्तकीच्या पोरा...' हे शब्द त्याच्या कानावर आदळले आणि तो संतापाने लालबुंद झाला. अपमान! आईचा अपमान? तो ताडकन उभा राहिला. पित्याने लाथ मारली तरी त्याने ती सहन केली होती. अपमान मानला नव्हता. पण आईचा अपमान त्याला सहन झाला नाही. तो म्हणाला,

"तात, आपण मला भ्याड म्हणालात; लाथ मारली; पण मी तिकडे दुर्लक्ष केलं. मी आपल्याला एक राजा म्हणून शरण आलो नव्हतो. पित्याची चरणधूली मस्तकी लावावी म्हणून मी इथे आलो होतो. हे माझं राज्य आपलंच नव्हे का? मी आपलाच पुत्र नाही का? मग शरण येण्याचा प्रश्नच कोठे येत होता? आज केवढं स्वप्न माझ्या डोळ्यासमोर होतं, मी म्हणत होतो आता पिताजींना भेटावं आणि सांगावं आता आपण थकलात. विश्रांती घ्या. मी श्यामकर्णाच्या रक्षणाचा भार स्वीकारतो. हा आपल्याचकडचा यज्ञ. मी मदत करतो. हे स्वप्न उराशी बाळगून आलो होतो; पण तात, .... मी माझ्या आईचा अपमान सहन करू शकत नाही. धर्मानंच आई ही पित्यापेक्षा श्रेष्ठ ठरविली आहे. तिचा अपमान सहन करील तो मुलगा कसला? मी आपल्या रक्तानंच अपमान धुऊन काढीन. मी भ्याड नाही, हे आता रणांगणावरच सिद्ध होईल. येतो मी! आता आपली गाठ रणांगणावरच होईल. महामंत्री, ही खंडणी परत घेऊन चला. युद्धाच्या नौबती वाजवा. शंखभेरी निनादू द्या. या मणिपूरचा दरारा, पराक्रम साऱ्यांना समजू द्या."

सगळे परत फिरले. दमदार पावले टाकीत चाललेल्या

बभ्रुवाहनाकडे तो अवाक् होऊन पाहत होता. आपल्या प्रतिकृतीचं दर्शन त्याला त्याच्या चालण्यात जाणवत होतं.

बभ्रुवाहन मणिपुरात आला. आता त्याचा विचार ठरला होता. पित्याशी युद्ध! त्रिखंड कीर्तीच्या पित्याशी युद्ध!! सामान्य राजा असता तर त्याला हा निर्णय घेता आला नसता. बभ्रुवाहनाचं धैर्य वाखाणण्यासारखं होतं. अर्जुनाशी लढणं ही सामान्य गोष्ट नव्हती; तरी त्याचा उत्साह, आवेश, धैर्य, एवढं मोठं होतं की निश्चित विजय मिळेलच असं त्याचं मन सांगत होतं!

बभ्रुवाहनाने रणांगणावर जायची तयारी केली. रथ सज्ज झाला. त्याने स्वत: शस्त्रास्त्रे भरण्यावर देखरेख केली. कवच घातलं. हाती धनुष्य घेतलं आणि आईचा आशीर्वाद घेण्यासाठी तो महालात आला, आईही त्याला भेटण्यासाठी उत्सुक होती. बभ्रुवाहनाने खाली वाकून नमस्कार केला. "विजयी व्हा" असा आशीर्वाद तिने दिला आणि विचारले,

"बाळा, यशस्वी होऊन तू येशीलच, पण काय रे आज शत्रू आहे तरी कोण?"

"आई..." क्षणभर बभ्रुवाहन थांबला आणि मग म्हणाला, - "शत्रू कोणी का असेना त्याला जिंकायचं, धैर्यानं तोंड द्यायचं एवढंच मी जाणतो."

"तरी पण... कोणी फार मोठा शत्रू आहे का?"

"हो, महाबलाढ्य! आत्तापर्यंत सतत विजय मिळविणारा, त्रिखंड कीर्तीचा!"

"असं. मग त्याचं नाव?"

"आई, नावाशी काय करायचं आहे? एवढ्या मोठ्या

शत्रूशी गाठ पडली तर माझा पराभव होईल, अशी भीती नाही ना वाटत तुला?''

''छे, वीरमातेला असं कधीच वाटत नसतं. माझा बाळ पराक्रमी आहे. त्याच्या पराक्रमाची खात्री आहे मला. एवढंच काय प्रत्यक्ष पिता जरी समोर उभा ठाकला तरी तू काकणभर सरस ठरशील. असा विश्वास आहे मला.''

''बस्स! आई हाच तुझा आशीर्वाद. आम्ही विजयी होऊनच येऊ.''

रणांगणावर पांडव सैन्य आणि बभ्रुवाहनाचे सैन्य यांची गाठ पडली. युद्धाला तोंड लागले. बभ्रुवाहनाचा आवेश पाहून अर्जुन चकित झाला. थोड्याच वेळात रणभूमीने उग्र स्वरूप धारण केले. रक्ताचे पाट वाहू लागले. मांसाचा चिखल झाला. घोड्यांचे खिंकाळणे, हत्तींचे चित्कारणे, वीरांचे ओरडणे, जखमी वीरांचे आक्रोश! वेगाने बभ्रुवाहनाचे सैन्य पांडव सैन्याला ठार मारीत होते. तो वेग असह्य होता. पांडव सैन्यात अतिरथी ठरलेले, महारथी ठरलेले वीर बभ्रुवाहनाने पार धुळीस मिळविले. वाऱ्याच्या सोसाट्याने पाचोळा जसा सैरभैर होतो, तशी अवस्था पांडव सैन्याची झाली. बभ्रुवाहनाचा हा आवेश असाच कायम राहिला तर पराभव अटळ आहे, याची खूणगाठ अर्जुनाने मारली. एवढ्यात एक गिधाड आले आणि अर्जुनाच्या रथावर बसले. अर्जुन मनात धास्तावला. अपशकुन...! वीराने शकुनापशकुनांची पर्वा करायची नसते; पण रथावर गिधाड बसताच आधीच डळमळीत झालेल्या अर्जुनाच्या मनाने ठाव सोडला. युद्धात जय मिळवायचा म्हणजे आत्मविश्वास हवाच! आत्मविश्वासाने उभे राहिले की निम्मे काम होते. मनाच्या दोलायमान अवस्थेत जय कधी मिळत

नसतो. आता या युद्धात जय मिळेल आणि श्यामकर्ण घेऊन आपण परत हस्तिनापूरला जाऊ असे त्याला वाटेना. या आंदोलित अवस्थेतच सूर्यास्त झाला. युद्ध संपले. अर्जुनाच्या दृष्टीने आजचे मरण उद्यावर गेले. आणि बभ्रुवाहनाचे सैन्य विजयोन्मादाने मणिपुरात परत आले. त्या दिवशी विजयश्रीने गळ्यात माळ घातली होती.

दुसऱ्या दिवशी पहाटेच बभ्रुवाहनाने परत आपल्या रथाची सिद्धता केली. वेगवेगळ्या प्रकारचे बाण भात्यात भरले आईच्या महालात जाऊन नमस्कार केला. आशीर्वाद घेतला. चित्रांगदा म्हणाली.

"बाळा, आज शत्रूचा नि:पात करून ये."

"आई, शत्रूला ठार मारून केवळ मला विजय मिळवायचा नाही. मानवी जीवनात शत्रूच्या नि:पातापेक्षा शत्रुत्वाचा नि:पात करणं आवश्यक आहे. जीवनात येऊन केवळ जगण्याला किंमत नाही; त्यातून सुसंस्कारित, श्रेष्ठतम जीवन मानवाला निर्माण करता आलं पाहिजे. याकरता मनातील विकार, किल्मिषं नाहीशी झाली पाहिजेत. अशा निर्मळ मनाच्या संवादी मानवी जीवनातून समाजजीवनाची मनोरम कलाकृती निर्माण होत असते. समाजातील प्रत्येक घटक, प्रत्येक पेशा सारख्याच तोलामोलाचा असतो. या साऱ्या तारांचे सुसंवादी सूर निघाले, तर समाजजीवन सुरेल होईल.

मला हे दाखवून द्यायचे आहे. हा लढा त्यासाठी आहे. आई ते जाऊ दे. आम्हाला उशीर होईल, येतो आम्ही!"

बभ्रुवाहन रणांगणात आला. पुन्हा युद्धाला तोंड लागले. वीरांच्या आव्हानं प्रतिआव्हानांना सुरुवात झाली. अर्जुनाने आपला रथ पुढे काढला आणि बभ्रुवाहनाच्या रथासमोर उभा

करीत तो म्हणाला.

"सांभाळ, माझ्या शरवर्षावापुढे भीष्म, कर्णही टिकले नाहीत, तिथं तुझी काय कथा."

"मला माहीत आहे. सारं महाभारत मला ठाऊक आहे. शूर वीर पराक्रम कधी बोलून दाखवीत नाहीत. काय करायचं आहे ते करून दाखवा. तुमच्या बाणांचा समाचार घ्यायला मी उभा आहे. येऊ द्या बाण."

अर्जुनाने बाण मारायला सुरुवात केली . बभ्रुवाहन पर्वतासारखा स्थिर होता. आणि मग अर्जुनाने अस्त्रांचा मारा सुरू केला. बभ्रुवाहनाने मारा परत फिरवला व तो म्हणाला, "अर्जुना, हे असलं युद्ध, ही अस्त्रं आता फार जुनी झाली आहेत. नवीन बाण असतील तर काढा. नाहीतर आता माझ्या बाणांचा मारा सहन करा".

अर्जुनही काही कमी शूर नव्हता. आषाढ घनांशी वादळवाऱ्याचे युद्ध व्हावे तसे हे युद्ध होते. कोणीच कोणाला हार जात नव्हता आणि शेवटी बभ्रुवाहनाने एक तेजस्वी बाण काढला. नेम धरला आणि अर्जुनावर सोडला. अर्जुनाच्या बाहूवर बाण बसला आणि तो खाली कोसळला.

पांडव सैन्यात हाहा:कार उडाला. सगळीकडे एकच विषय, अर्जुन पडला! अर्जुन पडला!!

विजयी बभ्रुवाहन मणिपुरात शिरला. त्याचा जयजयकार होत होता, विजयाची वाद्ये वाजत होती. सगळीकडे आनंद पसरला होता.

बभ्रुवाहन आईच्या महालात गेला. ती बभ्रुवाहनाचीच वाट पाहात होती. तो तिच्या पाया पडला.

"आई, तुझ्या आशीर्वादानं विजय मिळाला."

"धन्य बाळा! तू विजयी होशील अशी मला खात्री होतीच. किती आनंद झालाय म्हणून सांगू? बाळ, आज तुझा पराक्रम ह्यांनी पाहिला असता तर अभिमन्यूचं दुःख ते विसरले असते. ह्या दुसऱ्या अभिमन्यूनं त्यांना दिलासा दिला असता. बाळा,..."

"आई ऽऽऽ"

"काय झालं रे?"

"आई... भलत्या कल्पना करू नकोस."

"म्हणजे... या काय भलत्या कल्पना आहेत?"

"आई... आपला शत्रू म्हणून ज्याच्याशी युद्ध केलं ते स्वतः अर्जुन होते. माझ्या बाणांनी ते पडले."

"काय? बभ्रु .. तू आपल्या पित्याला मारलंस? मला विधवा केलंस? कारट्या, काय केलसं हे? मी निरांजन आणलं ते या दिवट्या मुलाला ओवाळण्यासाठी? मला विधवा करणाऱ्याला ओवाळण्यासाठी? छे, मी अभिमन्यूची आणि तुझी तुलना उगीच केली. कोठे तो आणि कोठे तू? द्रौपदी, सुभद्रा या वीरमाता आता काय म्हणतील? मुलानं बापाला ठार केलं? आणि त्याच्या नगरात ह्या आनंदाप्रीत्यर्थ ही वाद्यं वाजत आहेत. बंद करा तो आवाज ... बंद करा! काय घडलं हे .. कारट्या, ज्या हातानं तू त्यांना मारलंस त्याच हातानं मलाही ठार मार... मीही त्याच्याबरोबर .."

"आई.."

बभ्रुवाहनाची हाक पूर्ण व्हायच्या आधीच चित्रांगदा

मूर्च्छित झाली. सारा महाल आपल्या भोवती फिरत आहे असे बभ्रुवाहनाला वाटले, आईच्या अपमानाचा बदला घ्यायला गेलो. धैर्याने युद्ध केले आणि परिणाम ... परिणाम हा झाला. पुन्हा नवीन संकट! काय करावे? आई थोर मानून पित्याला शासन करायला गेलो तर पती श्रेष्ठ मानून आईही त्यांच्या पाठोपाठ जाणार! अर्जुनाला जिवंत करण्यावाचून उपाय नाही; पण ते कसे करायचे? या संकटाला कसे तोंड द्यायचे? बभ्रुवाहनाचे विचारचक्र जोरात फिरू लागले. तो पुन्हापुन्हा रणभूमीवर काय घडले, अर्जुन कसे पडले हे आठवत होता. वास्तविक त्याला अर्जुनाला ठार मारायचे नव्हते. त्यासाठी त्याने अर्जुनाच्या उजव्या बाहूवर प्रहार केला होता; पण बाण लागताच अर्जुन खाली कोसळला होता.

थोड्या वेळातच ही वार्ता सगळीकडे पसरली. बभ्रुवाहनाची दुसरी माता उलूपी तीही शोक करीत तेथे आली. चित्रांगदा सावध झाली. ती पुन्हा शोक करू लागली. बभ्रुवाहनाने स्वत:ला सावरले. आईचे सांत्वन केले. तो म्हणाला,

"आई, अर्जुनांनी तुझा अपमान केला तो सहन न झाल्यानं मी त्यांच्याशी युद्ध केलं. ते माझ्या बाणांनी पडले माझ्या हातून चूक झाली. केवळ तुझ्या अपमानासाठी... आई, तू शोक करू नको. त्यांना मी पुन्हा जिवंत करतो. तुझ्या प्रेमासाठी, तुझ्यासाठी आणि आता माझ्यासाठीही!"

आईजवळ अर्जुनाला जिवंत करण्याची प्रतिज्ञा करून बभ्रुवाहन पुन्हा रणांगणात आला. नवीन संकटाला पुन्हा धैर्याने तोंड देणे आवश्यक होते. अर्जुन पडला होता तेथे तो आला. त्याने त्या शवाकडे पाहिले. शव हिरवे निळे होऊन पडले होते. अर्जुनाच्या बाहूवर बाण मारूनही तो

पडला कसा याचे रहस्य तत्काळ त्याच्या लक्षात आले. विषलिप्त बाण लागल्याने त्याच्या शरीरात विष भिनले होते. म्हणून अर्जुन खाली कोसळला होता. तो गतप्राण झाला नव्हता.

बभ्रुवाहन तत्काळ आईच्या महालात आला. त्याच्या चेहऱ्यावर वेगळाच निश्चय दिसत होता. आपण हाती घेतलेले काम पूर्ण करू असा निर्धार त्याच्या डोळ्यांत दिसत होता. आईजवळ येताच तो म्हणाला

"आई, माझ्यावर विश्वास ठेव. अर्जुन जिवंत होतील."

"का उगाच वेडी आशा दाखवतो आहेस? मेलेलं माणूस कधी जिवंत होईल का?... जा मला तोंडही दाखवू नकोस जा."

बभ्रुवाहनाने आईची समजूत घातली. अर्जुनाचा मृत्यू कसा झाला हे सविस्तर सांगितले आणि तो म्हणाला,

"आई, उलूपी माता नागकन्या आहे. तिच्या वडिलांच्या जवळ नागाचे भयंकर विष उतरून घेणारा मणी आहे. आपल्या जावयाला उठविण्यासाठी नागराज वासुकी तो मणी निश्चित देतील. नागलोक काही फार लांब नाही. आता काही घटकांतच तो मणी येईल, आणि अर्जुन पुन्हा जिवंत होतील."

दोन्ही मातांना हा उपाय योग्य वाटला. त्यांच्या डोळ्यांत आशेचा किरण तरळला. उलूपी म्हणाली,

"बभ्रु, पुंडरिकाला बोलाव. तो नाग असल्याने त्याला तेथली सगळी माहिती आहे. तुझे आजोबाही त्याला ओळखतात. शिवाय मी खुणेची अंगठीही त्याच्याजवळ देते म्हणजे ते लवकर मणी देतील."

पुंडरिकानं खुणेची अंगठी घेतली. तो तत्काळ नागलोकाकडे निघाला. आता साऱ्यांचे लक्ष लागले होते पुंडरिकाच्या रथाकडे. क्षणाक्षणाचा काळही खूप मोठा वाटत होता.

काही वेळाने रथ आला. साऱ्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. पुंडरिक रथातून खाली उतरला. त्याचा चेहरा म्लान होता. क्षणाची शांतताही कोणाला सहन करवत नव्हती. उलूपीने विचारले.

"आणला ना मणी?"

"नाही .."

"काय, मी अंगठी देऊनही ओळख पटली नाही?"

"ओळख पटली. नागराजांनी मणी दिलाही होता."

"मग ..?"

रागाने उसळतच बभ्रुवाहनाने विचारले.

"महाराज, नागराज वासुकींनी सारी हकीकत ऐकून मणी दिला, पण त्यांचा मंत्री धृतराष्ट्र याला ते सहन झाले नाही. त्याने अडथळा आणला. तो वासुकींना म्हणाला, "या मानवजातीवर विश्वास ठेवू नका. ह्या मण्यावर आपल्या राज्याची प्रतिष्ठा अवलंबून आहे. त्यांनी मणी परत दिला नाही तर? तुमच्या जावयापेक्षा राज्याचं हित अधिक महत्त्वाचं आहे."

"अस्सं काय?"

पुंडरीक पुढे सांगू लागला,

"महाराज वासुकीनं त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. आपलं वैर त्यांना परवडणार नाही हे सांगितलं; पण धृतराष्ट्र तेवढ्यापुरता गप्प बसला. मी मणी घेऊन निघालो,

त्यानं माझा पाठलाग करून मणी घेतला आणि तो त्याच्या वाड्याकडे पळाला.''

''ठीक आहे. आमच्याशी गाठ आहे म्हणावं,'' बभ्रुवाहन ताडकन उठला. त्याचा रथ नागलोकी जाऊन थडकला. बभ्रुवाहनाचा रथ आलेला पाहताच वासुकी त्याला सामोरा गेला. वासुकीची कल्पना झाली, बभ्रुवाहन मणी परत देण्यासाठीच आलेला असावा; त्याचा रागाने लाल झालेला चेहरा पाहून काय झालं हे वासुकीला कळेना. त्याने नम्रतेने विचारले,

''बाळा, असा रागावून का आलास? काय झालं?... त्यानं सारी हकीकत थोडक्यात सांगितली आणि तो म्हणाला,

''मला त्या दुष्टाचा वाडा दाखव.''

दोघेही धृतराष्ट्राच्या वाड्यावर आले. दरवाजा बंद होता. त्यांनी लाथाबुक्क्यांनी दार ठोठावयाला सुरवात केली. धृतराष्ट्राच्या मुलांनी ते पाहिले आणि वडिलांना सांगितले. आता आपली धडगत नाही हे पाहून धृतराष्ट्राने पोरांना सांगितले,

''तुम्ही रणांगणात जा आणि पार्थाचे शीर घेऊन पळून या. मी हा मणी बभ्रुवाहनाला देऊन टाकतो. धृतराष्ट्राचा मुलगा दुर्भाव आणि दुर्जय दोघेही मागच्या दाराने पळाले. धृतराष्ट्राने दार उघडले आणि संतप्त बभ्रुवाहनाच्या पायावर लोटांगण घातले. माफी मागितली. चूक कबूल केली; आणि मणी बभ्रुवाहनाला दिला. मणी हातात पडताच बभ्रुवाहन तावडतोब रथात बसला. घोड्यांना चाबूक मारला, रथ वेगाने धावू लागला; आणि स्मित्कल हसत धृतराष्ट्राने आपल्या वाड्याचे दार बंद केले.

बभ्रुवाहन तातडीने रणांगणावर आला. चित्रांगदा, उलूपीही

तेथे आल्या होत्या. धावत धावतच तो तेथे गेला. त्यांच्या पाया पडला आणि आनंदाने म्हणाला,

"आई, आई मणी आणलाय!

"म्हणजे...?"

"आई, मणी घेऊन आलो. पिताजींचा देह कुठं आहे. सांग, आता त्यांना जिवंत करतो."

"अरे, असं काय विचारतोस?

"म्हणजे ...?"

"तूच नाही का दुर्भावाला पाठवलंस? तुझी आणि धृतराष्ट्र आणि वासुकी यांच्यात तडजोड झाली असं त्यांनी सांगितलं. अर्जुनाचा व वृषकेतूचा देह तू नागलोकी मागितला आहेस असं सांगून त्यांनी आताच दोघांचे देह तिकडे नेले. आताच तो रथातून गेला."

"अस्सं, माझ्याशी कपट काय? मला मणी देण्याचं नाटक केलं आणि इकडे पिताजींचा देह पळविला काय? हा दुष्टपणा मी चालून देणार नाही. आई, सांग कोठून गेला तो. मी त्याचा पाठलाग करीन."

संकटाची परंपरा कोसळत होती. एकातून मार्ग निघाला की दुसरे संकट समोर यायचे, तरीही बभ्रुवाहन डगमगला नाही. त्याने धैर्याने साऱ्या संकटांना तोंड दिले. आईने ज्या दिशेने बोट केले त्या दिशेने बभ्रुवाहनाचा रथ वेगाने दौडू लागला. जणू वाऱ्याशी स्पर्धा करीत होता. थोड्याच वेळाने पुढे धूळ उडताना दिसली. त्याने ओळखले, की हाच दुर्भावाचा रथ असला पाहिजे. बभ्रुवाहनाने आपल्या रथाचा वेग आणखी वाढविला. बाणाच्या टप्प्यात येताच बभ्रुवाहनाने एकच बाण

अशा वेगाने सोडला की दुर्भावाच्या कानाजवळून तो गेला. नुसत्या त्याच्या वेगाने तो घाबरला. आपल्या भावाला त्याने घाई करायला सांगितले.

तरीही बभ्रुवाहनाने त्याला गाठले.

दोन्ही रथ समांतर झाले.

दोघांनी गदा काढल्या. एकमेकांवर प्रहार होऊ लागले.

संधी सापडताच बभ्रुवाहनाने दुर्भावाच्या घोड्याच्या पाठीत गदेचा एक टोला हाणला. घोडा तत्काळ गतप्राण झाला. थोड्याच वेळात बभ्रुवाहनाने रथातच त्या दोघांनाही ठार केले. अर्जुनाचा आणि वृषकेतूचा देह आपल्या रथात घेतला.



रथाला वेग दिला. रथातच त्या दोन्ही वीरांना त्याने मणीस्पर्श केला. मणी हिरवा-निळा पडला आणि त्यांची शरीरे पूर्ववत झाली. श्वासोच्छ्वास सुरू झाला.

चित्रांगदा डोळ्यात प्राण आणून वाट पाहात होती.

उलूपी काळजी करीत होती. दोघी बभ्रुवाहनाच्या मार्गाकडे डोळे लावून बसल्या होत्या.

रथ पुन्हा रणभूमीवर आला. दोघी धावतच तेथे आल्या. एव्हाना अर्जुन, वृषकेतू पूर्ण सावध झाले. त्यांनी ते दृश्य पाहिले. सगळे आनंदात नहात होते. शब्द मुके झाले होते. अर्जुनाने बभ्रुवाहनाला गाढ आलिंगन दिले आणि म्हणाला,

"बाळा, आज तुझ्या शौर्यावर आणि धैर्यावर आम्ही संतुष्ट आहोत. ज्या धैर्यानं तू माझ्याशी युद्ध केलंस ते पाहून मी प्रसन्न झालो आहे."

"तात, ही सारी आपली आणि आईची कृपा."

"बाळा, तुझ्या पराक्रमानं आज मला दुसरा अभिमन्यू मिळाला, तुझा पराक्रमच मला पाहायचा होता. तुला डिवचल्या शिवाय तू युद्धाला उभा राहणार नाहीस याची मला कल्पना होती; म्हणूनच तुझ्या श्रद्धास्थानावर - आईवर - मी शब्दप्रहार केला. पण दैव बलवत्तर होतं म्हणून ठीक झालं, नाहीतर ही कल्पना माझ्या अंगाशी आली असती."

पितापुत्रांचं हे प्रेम उलूपी आणि चित्रांगदा पाहत होत्या. त्याही कृतार्थ झाल्या. प्रेमाच्या या वर्षावाने त्यांचे डोळे झरत होते; पण आत्ताचे अश्रू आनंदाचे होते!!

# पारिजातकाचे फूल

'नारायणऽऽ नारायण' असे शब्द कानावर आले. त्या पाठोपाठ ब्रह्मवीणेचा मंजूळ आवाज ऐकू आला. तो ऐकून श्रीकृष्ण रुक्मिणीला म्हणाला,

"रुक्मिणी, नारद आलेले दिसतात. त्यांचं स्वागत करायला हवं."

"आज बरेच दिवसांनी आलेत. काही विशेष काम तर आणलं नाही ना?"

"मला तरी काय माहीतं? पाहू या."

दोघांचे बोलणे चालू असतानाच नारदांनी महालात प्रवेश केला. श्रीकृष्ण उठला. मोठ्या सन्मानाने त्याने त्यांना आत आणले. आसनावर बसविले. रुक्मिणीने दासीला सांगताच तिने पूजेचे साहित्य आणले. दोघांनी त्यांची पूजा केली. त्यांना दूध-फळे दिली. मग कृष्णाने विचारले,

"नारदा, आज आमच्याकडे आलात, काही विशेष?"

"विशेष काय असणार? अरे, बरेच दिवसांत तुझं दर्शन झालं नव्हतं. देवेंद्राकडून आकाशमार्गाने येत असताना द्वारका दिसली. विचार केला, तुला भेटावं नि मग पुढे जावें."

"नारदा, एवढी आमची आठवण ठेवली, आनंद वाटला."

मग दोघेही बराच वेळ बोलत बसले. बोलणे संपल्यावर नारद जायला उठले. तोच त्यांना आठवण झाली आणि ते कृष्णाला म्हणाले,

"कृष्णा, मी विसरलोच की ...."

"काय?"

"देवेंद्राने हे पारिजातकाचे फूल मला दिले होते. मनात आलं हे स्वर्गातलं फूल तुला द्यावं नि मग जावं."

असे म्हणत त्यांनी ते फूल कृष्णाच्या हाती दिले. त्याच्या त्या पांढऱ्या स्वच्छ नाजूक पाकळ्या, लाल-केशरी देठ, देठाखाली असलेली हिरवीगार टवटवीत दोन पाने, त्याला येत असलेला मंद मधुर वास याने कृष्ण आणि रुक्मिणी भारावून गेले. त्या फुलाच्या दर्शनाने आनंदित झालेली रुक्मिणी म्हणाली,

"नारदा, तुम्ही आल्यापासून हा महाल दिव्य सुगंधाने भरून गेला होता. आता कारण कळलं. काय सुरेख फूल आहे नाही? आणि त्याचा वास तर ....."

"आवडलं तुला?"

असे विचारताच कृष्णाने ते फूल रुक्मिणीला दिले. तिने ते डोळे भरून पाहिले. त्याच वास घेतला नि मग ते फूल तिने आपल्या डोक्यात घातले. मुळातच सुंदर असणारी रुक्मिणी त्या देवपुष्पाने अधिकच सुंदर दिसू लागली. सोन्याला सुगंध मिळाला. तिच्या चेहऱ्यावर नाचणाऱ्या आनंदाकडे पाहात नारद म्हणाले,

"हे देवी, पतिव्रते! हे फूल तुझ्याचसाठी योग्य आहे. मला तर वाटतं. या फुलामुळे तू शोभून दिसत नसून तुझ्यामुळेच हे फूल अधिक सुंदर दिसते आहे."

"नारदा, एवढी स्तुती करायला नको हं! माझी स्तुती करून कुठे कळ लावण्याचा तर विचार नाही ना?"

"देवी, भलतंच काय बोलता? मी खरं तेच सांगतो. हे फूल दैवी आहे. अनेक गुण यात आहेत. हे कधीही सुकणार नाही. हे फूल एक वर्ष तुझ्याजवळ राहील नंतर ते मूळ स्थानी जाईल. तोपर्यंत तुला पाहिजे तो सुवास

ते देईल. एवढेच काय तू ज्या ज्या फुलांची इच्छा करशील ती ती फुले तुला लगेच प्राप्त होतील. तुझ्या साऱ्या मनोकामना पूर्ण करण्याची शक्ती या फुलात आहे. हे फूल डोक्यात माळल्याने तुला तहान लागणार नाही. भूक लागणार नाही. थकवाही येणार नाही.''

ते ऐकून रुक्मिणीचा चेहरा क्षणाक्षणाला उजळत होता. नकळत ती बोलून गेली.

''खरंच, किती भाग्यवान आहे मी?''

''खरंच तू भाग्यवान आहेस. तुला हे फूल देऊन कृष्णाने तुझ्यावरचे उत्कट प्रेमच प्रकट केले आहे. सत्यभामेलाही हे भाग्य लाभले नाही. रुक्मिणी, खरंच तू भाग्यवान आहेस.''

रुक्मिणीची ही स्तुती ऐकून कृष्णालाही आनंद झाला; पण ती स्तुती महालात असणाऱ्या सत्यभामेच्या दासीही ऐकत होत्या. थोड्याच वेळात नारद निघून गेल्यावर त्या दासी सत्यभामेकडे आल्या. त्यांनी नारद आल्यापासून घडलेल्या सगळ्या घटना सत्यभामेला सांगितल्या. पारिजातकाचे फूल रुक्मिणीने डोक्यात घातल्यावर नारदांनी तिची केलेली स्तुती, 'सत्यभामेपेक्षाही तू भाग्यवान आहेस' हे त्यांचे बोलणे, कृष्णाला झालेला आनंद या सगळ्याच गोष्टी दासींनी अगदी तिखटमीठ लावून सांगितल्या. ते ऐकत असताना सत्यभामेचा चेहरा क्षणाक्षणाला बदलत होता. मत्सराने तिच्या अंगाची आग आग होऊ लागली. रागाने ती लाल झाली. संतापाने उठली. ताड ..... ताड पावले टाकीत ती क्रोधागारात गेली. अंगावरचे अलंकार काढून फेकून दिले. केस मोकळे सोडले आणि मंचकावर रागावून पडून राहिली. सत्यभामेचा तो रुद्रावतार पाहून क्षणभर दासीही गांगरल्या. मग त्या कृष्णाकडे गेल्या आणि त्याला बाजूला बोलावून त्यांनी सांगितले,

"देवी फार रागावल्या आहेत. क्रोधागारात गेल्या आहेत."

ते ऐकून क्षणभर कृष्णालाही आश्चर्य वाटले; पण दुसऱ्याच क्षणी तो थोडा हसला. त्याच्या लक्षात आले की, हा पारिजातकाच्या फुलाचा प्रताप आहे. तो दासींबरोबर सत्यभामा जिथे होती तेथे गेला. अस्ताव्यस्त पडलेले दागिने, मंचकावर पालथी झोपून मुसमुसणाऱ्या सत्यभामेला पाहून, रागाचा पारा बराच वाढलेला आहे हे त्याने ओळखले. तेवढ्यात दासींनी सांगितले,

"देवी, महाराज आपल्या दर्शनाला आले आहेत."

"त्यांना म्हणावं, रुक्मिणीदेवींशीच बोलत बसा. माझ्याकडे कशाला आलात?" फणकाऱ्याने सत्यभामा म्हणाली.

"सत्यभामे ......" कृष्णाने गोड शब्दांत हाक मारली.

"काही बोलू नका माझ्याशी. मी कोण तुमची? तुमचं खरं प्रेम माझ्यावर नाहीच! रुक्मिणीदेवीच तुम्हाला जास्त आवडतात. जा. त्यांच्याशीच बोलत वसा."

"अग, पण माझं ऐकून तर घेशील?"

"आता काय ऐकायचं आहे. जे ऐकलं तेवढं पुरे झालं!"

"अग, तुझ्यावर प्रेम नाही असं कोण म्हणतो? तू तर इतकी सुंदर आहेस, गुणी आहेस की ....."

"काही साखरपेरणी करू नका."

"खरंच सांगतो आहे हे मी! तुझ्यावर माझं मनापासून प्रेम आहे."

"म्हणून तुम्ही पारिजातकाचे फूल रुक्मिणीदेवींना दिले होय?"

"ती तिथे होती. तिला आवडलें म्हणून ....."

"मलाही आवडलं असतं की ...... पण मला कोण विचारणार? आणि काय हो, नारद तिची एवढी स्तुती करीत होते. माझ्यापेक्षाही ती भाग्यवान आहे, हे तुमच्यादेखत म्हणत होते तरी तुम्ही शांतपणे ऐकून घेत होतात."

"मग काय करणार?"

"काय करणार? ...... तुमचं माझ्यावर प्रेमच नाही मुळी!"

"सत्यभामे, अग एक पारिजातकाचे फूल ते काय अन् त्यासाठी ....."

"ते साधं फूल आहे होय? दैवीफूल आहे म्हटलं ......"

"म्हणून काय झालं? एका फुलासाठी एवढं रागवायचं? तू एका फुलासाठी एवढी रागावशील हे आधी माहीत असतं तर तुला दिलं असतं ते!"

"खोटं नका बोलू. मी अशी फसायची नाही. मला माहीत आहे. तुमचं खरं प्रेम रुक्मिणीदेवींवरच आहे."

"वेडी कुठली, अग, प्रेम काय बोलून दाखवायचं असतं? तुझ्यावरही माझं किती प्रेम आहे म्हणून सांगू ......"

"नुसतं बोलून काय उपयोग?"

"मग काय करू म्हणजे माझं तुझ्यावर खूप प्रेम आहे हे तुला पटेल?"

"विचार करून बोलताय ना हे? नाहीतर ......"

"अगदी विचार करून बोलतोय. सांग काय देऊ तुला?"

"तुम्ही रुक्मिणीदेवींना पारिजातकाचं एक फूल दिलं ना?"

"हो. दिलं."

"मग देवेंद्राच्या बागेतलं पारिजातकाचं झाडच मला आणून द्या. माझ्या बागेत ते फुललं पाहिजे."

"बस, एवढंच ना! मी पारिजातकाचं झाड स्वर्गातून आणीन आणि तुझ्या बागेत लावीन. मग तर आमच्या देवी सत्यभामाबाई आमच्यावर प्रसन्न होतील ना?"

एवढे मोठे आश्वासन मिळाल्यावर सत्यभामेचा राग नाहीसा झाला. तिच्या नाजूक, सुंदर मुखावर हास्याचे सुरेख चांदणे पसरले. ती उठली. आपले अलंकार अंगावर घालू लागली. क्षणात बदललेल्या रूपाने कृष्णही सुखावला. तिच्या आनंदाने उचंबळून आलेल्या मोहक हालचाली आपल्या डोळ्यांत साठवीत असतानाच त्याच्या मनात आलं, "किती मत्सर करते ही रुक्मिणीचा! रुक्मिणी म्हणजे शुद्ध भक्ती ..... शुद्ध प्रेम! तिचा मत्सर करून माझं प्रेम मिळवता येईल असं हिला वाटलं तरी कसं?"

थोड्याच वेळात सत्यभामेने कृष्णाला आपल्या महालात नेले. त्याला केशरी दूध दिले. कृष्ण दूध पीत असतानाच लाडिकपणे ती म्हणाली,

"पारिजातकाच्या वृक्षाचं विसरायचं नाही हं!"

मिस्किलपणे कृष्णही म्हणाला,

"कसा विसरेन? तुझ्यावरच्या प्रेमाची ती खूण आहे."

कृष्ण महालाबाहेर पडला. सत्यभामा आपल्या विजयाच्या आनंदात मग्न होऊन त्याच्या जाणाऱ्या आकृतीकडे कितीतरी वेळ पाहात उभी राहिली होती.

❀ ❀ ❀

# पारिजात हरण

रागारागानेच सत्यभामा कृष्णाच्या मंदिरात आली. तिच्या चालण्यावरून आणि चेहऱ्यावरून कृष्णाने ते ओळखले. ती जवळ येताच तो म्हणाला,

"महाराणी रागावलेल्या दिसतात आज! काही चुकलं का आमचं?"

"छे .... छे, तुमचं कसलं चुकतंय? चुकलं आमचंच! तुमच्या मधाळ बोलण्यावर विश्वास ठेवला ....."

"मधाळ बोलणं ...... अन् ते कोणतं बुवा?"

"आता कशाला आठवेल? चार-सहा दिवसांपूर्वी मला तोंड भरून सांगितलं, पारिजातकाचा वृक्षच तुझ्या बागेत आणून लावतो."

"ते आश्वासन होय ...... अग, ते मी मुळीच विसरलो नाही. त्याच विचारात आहे मी."

"आणखी किती खोटं सांगणार आहात ....."

"खोटं मी कधीच बोलत नाही. थांब. बस इथे. आत्ताच तुझ्यादेखत कामाला सुरुवात करतो."

थोड्या रागातच सत्यभामा मंचकावर बसली. कृष्ण काय करतो आहे ते बारकाईने पाहू लागली. कृष्ण मांडी घालून बसला. डोळे मिटले. नारदांचे स्मरण केले. थोड्याच वेळात नारद तेथे आले. त्यांना आसन देऊन, त्यांचे पूजन केले. नारदांनीच मग कृष्णाला विचारले,

"कृष्णा, आज माझी एवढी आठवण झाली?"

"नारदा, माझं एक महत्त्वाचं कार्य तुला करायचं आहे."

"ते कोणतं?"

"तू देवेंद्राकडे जा आणि त्याला माझा निरोप सांग की, तुझ्या पत्नीच्या बागेत असलेल्या पारिजात वृक्षाची थोरवी आम्ही ऐकली. त्याच्या फुलाने आम्हाला खूप आनंद झाला आहे. त्या वृक्षाची फुले माझ्या प्रिय पत्नीला हवी आहेत. तिला मी तो वृक्षच तुझ्या दारी आणून लावतो असे सांगितले आहे. तेव्हा माझ्या शब्दाखातर तो वृक्ष तू आम्हाला दे. तिची तृप्ती झाली की मी आपण होऊन तो वृक्ष स्वर्गात आणून पोहोचवीन."

नारदाने तो निरोप ऐकला नि त्याच्या चेहऱ्यावर चिंतेचे जाळे पसरले. काय बोलावे हे त्याला सुचेना. क्षणभराने नारद कृष्णाला म्हणाले,

"कृष्णा, तुझा निरोप मी देवेंद्राला सांगेन पण ....."

"पण काय?"

"देवेंद्र तो वृक्ष देईल का नाही याची शंका आहे."

"का?"

"तो त्याच्या पत्नीचा - शचीचा क्रीडावृक्ष आहे. सौभाग्यासाठी ती रोज त्याची पूजा करीत असते. महादेवानेसुद्धा पार्वतीच्या हट्टासाठी तो वृक्ष एकदा मागितला होता; परंतु इंद्राने तो दिला नव्हता. तेव्हा आतातरी तो देईल किंवा नाही हे कसं सांगणार?"

"नारदा, इंद्राचे आणि माझे भावाभावाचे नाते आहे हे तुला माहीत आहे ना? धाकट्या भावासाठीसुद्धा तो हा वृक्ष देणार नाही?"

"तो वृक्ष कोणालाच द्यायचा नाही असं त्यांनी ठरवलं

आहे. शिवाय तो स्वर्गीय वृक्ष असल्याने पृथ्वीतलावर आणायला तो संमती देईल असं वाटत नाही.''

ते ऐकून सत्यभामेचा चेहरा बदलला. आपला हट्ट पुरा होणे कठीण आहे हे जाणून तिचा चेहरा निराशेने भरून गेला. आपल्या शब्दाचा मान राखला जात नाही हे पाहून कृष्ण संतापला. तोही ईर्ष्येला पेटला आणि म्हणाला,

''नारदा, तो वृक्ष पृथ्वीवर आमच्याकडे आलाच पाहिजे. इंद्राने बऱ्याबोलाने पारिजात दिला तर ठीक नाही तर ....''

''नाही तर काय देवा ...?''

''नाही तर आम्ही त्याच्याशी युद्ध करू आणि आमच्या राणीच्या हट्टासाठी तो वृक्ष येथे आणू.''

तो निश्चय पाहून सत्यभामेचा चेहरा उजळला. कृष्णाचे आपल्यावरील प्रेम पाहून ती खूप खूप सुखावली. नारदांनी कृष्णाचा निरोप घेतला आणि ते आकाशमार्गाने देवेंद्राकडे निघून गेले.

दोन दिवसांनी नारद परत द्वारकेला आले. त्यांचा चेहरा म्लानच होता. कृष्णानेही काय घडले याची मनात कल्पना केली. त्यांचे आदरातिथ्य करून मग त्याने विचारले,

''काय नारदा, सांगितलात आमचा निरोप?''

''सांगितला.''

''मग? देवेंद्र पारिजात वृक्ष देत नाही म्हणाला, असंच ना?''

''देवा, तुझा निरोप मी नम्रतेने त्याच्या कानावर घातला. त्यानेही तो शांतपणे ऐकला. मग विचार करून तो म्हणाला,

'नारदा, पारिजात हे एक रत्न आहे. स्वर्गीय रत्न

आहे. ही स्वर्गीय रत्ने लहानसहान कार्यासाठी पृथ्वीवर नेऊ नयेत अशी मर्यादा आहे. ब्रह्मदेवांनीच ही मर्यादा घालून दिली आहे. तेव्हा कृष्णाने ती मर्यादा मोडू नये असे मला वाटते.'

देवेंद्राने असे सांगितल्यावर मी त्याला परोपरीने समजावून सांगितले. पारिजात काही दिवसांसाठीच हवा आहे, नंतर तो पुन्हा स्वर्गात येईल हे. ही पुन्हा पुन्हा सांगितले; पण तो आपले म्हणणे सोडायला तयार होईना. अखेर मी त्याला स्पष्टच सांगितले की ....."

"काय सांगितले?" सत्यभामेने उतावीळपणे विचारले.

"की जर तू वृक्ष दिला नाहीस तर कृष्ण तुझ्याशी युद्ध करून तो वृक्ष घेऊन जाईल."

"मग त्यावर तो काय म्हणाला?"

"क्षणभर तो काहीच बोलला नाही. नंतर म्हणाला, 'जशी त्याची इच्छा! पण नारदा, हा वृक्ष मी होऊन देणार नाही. कृष्णाला पारिजात हवा असेल तर माझ्याशी युद्ध करून, माझा पराभव करूनच न्यावा लागेल. त्याला म्हणावं, तू माझा धाकटा भाऊ आहेस; तू आधी माझ्यावर प्रहार कर. मी युद्धाला तयार आहे.' देवा, तेथे काय घडले हे मी तुला सविस्तर सांगितले. आता योग्य असेल ते तू कर."

"ठीक आहे. नारदा, तू तुझं काम केलंस, आता मी बघतो."

थोड्याच वेळात नारदांनी कृष्णाचा निरोप घेतला आणि ते निघून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळीच कृष्णाने दारुकाला आपला रथ सज्ज करायला सांगितला. सात्यकीला बोलावून घेतले. त्याला शस्त्रसज्ज होऊन आपल्या रथात येण्यास सांगितले. प्रद्युम्नालाही आपल्या मागोमाग येण्यास सांगितले आणि 'शिकारीला जातो' असे सांगून ते सगळे बाहेर पडले. रैवतक पर्वताच्या दाट झाडीच्या प्रदेशात आल्यावर कृष्णाने दारुकाला रथ थांबवायला सांगितले. कृष्ण, सात्यकी रथातून खाली उतरले. प्रद्युम्नही होताच. कृष्णाने गरुडाचे स्मरण करताच तो पक्षिराज कृष्णासमोर उभा राहिला. कृष्ण सात्यकीसह गरुडावर आरूढ झाला. प्रद्युम्नालाही वेगळा रथ घेऊन आकाशमार्गाने स्वर्गात येण्यास सांगितले. थोड्याच वेळात ते देवेंद्राच्या नंदनवनात पोहोचले.

नंदनवन पारिजात फुलांच्या वासाने भरून गेले होते. त्या सुवासात इतर स्वर्गीय फुलांचा सुगंधही मिसळला होता. सर्वांनाच त्या सुवासामुळे प्रसन्न वाटले. कृष्ण, सात्यकी त्या वृक्षाजवळ पोहोचले. तो त्यांना दिसले की, देवेंद्राचे अनेक रक्षक त्या वृक्षाचे रक्षण करीत आहेत. कृष्णाने त्यांचा सहजासहजी पराभव केला. काही रक्षक मारले गेले. काही पळून गेले. मग कृष्ण त्या वृक्षाजवळ गेला. त्याने तो वृक्ष उपटला. पक्षिराज गरुडावर ठेवला आणि मग तो सात्यकीला म्हणाला,

"सात्यकी, आता आपल्याला सावध राहायला हवं. पळून गेलेले रक्षक ही वार्ता देवेंद्राला सांगतील. तो युद्धाला येईल. आपणही भ्याडासारखा हा वृक्ष पळवून नेला असे कोणी म्हणायला नको, म्हणून या वृक्षासह अमरावती नगरीला प्रदक्षिणा घालू आणि मगच द्वारकेला जाऊ."

कृष्ण, सात्यकी गरुडावरून आणि प्रद्युम्न आकाशगामी

रथातून अमरावतीला प्रदक्षिणा घालू लागले. प्रदक्षिणा पूर्ण होत असतानाच कृष्णाने पाहिले तो पूर्व द्वारातून ऐरावतावर बसून इंद्र त्यांच्याचकडे निघाला होता. त्याचा पुत्र जयंत हाही त्याच्या पाठोपाठ रथात बसून येत होता. थोड्याच वेळात इंद्र कृष्णासमोर येऊन म्हणाला,

"कृष्णा, थांब. माझ्याशी युद्ध करून मला पराभूत केल्याशिवाय तुला हा वृक्षराज नेता येणार नाही."

"देवेंद्रा, भावाचं नातं विसरून तुला युद्धाचीच हौस दिसते. ठीक आहे. तुझ्याच इच्छेप्रमाणे मी युद्धात तुला पराभूत करूनच हा वृक्ष घेऊन जाईन. आता माझ्या तीक्ष्ण बाणांपासून स्वत:चे रक्षण कर."

दोघांनी एकमेकांना आव्हान दिले आणि एकमेकांचे बाण एकमेकांवर कोसळू लागले. दोघेही उत्तम योद्धे असल्याने कोणीच कोणाला आटोपत नव्हते. दुसरीकडे इंद्राचा पुत्र जयंत आणि कृष्णाचा पुत्र प्रद्युम्न दोघांनीही आपले रथ समोरासमोर आणले आणि त्यांच्यातही तुंबळ युद्ध सुरू झाले. दोघांनी एकमेकांना बाणांनी झाकून टाकले.

देवेंद्र युद्धाला निघालेला पाहून त्याचा मित्र महाबलाढ्य, महापराक्रमी प्रवर हाही रणांगणात आला. सात्यकीशी लढू लागला. तीन यादव वीरांचे तीन देववीरांशी युद्ध सुरू होते. शस्त्रे एकमेकांवर आपटत होती. बाणांचा वर्षाव सुरूच होता. त्या घनघोर युद्धाने आकाश डळमळू लागले. स्वर्गासह पृथ्वी थरथरा कापू लागली. दिशा धुंद झाल्या. या महासंग्रामातून काय घडणार हे कोणालाच कळेना. स्वर्गातले सारे देव, ब्रह्मदेव, शिवशंकर साऱ्यांनाच चिंता वाटू लागली. हे युद्ध थांबवावे कसे हे कोणालाच कळेना.

अखेर ब्रह्मदेवांना एक युक्ती सुचली. ते आपल्या पुत्राकडे कश्यपाकडे आले. म्हणाले,

"कश्यपा, अरे देवेंद्र आणि कृष्ण यांच्यातले युद्ध हातघाईवर आले आहे. दोन्ही तुझेच पुत्र! काही भयंकर घडण्यापूर्वी तू अदितीसह रणांगणात जा. दोघांनाही आवरून होणारा अनर्थ टाळ. तुमच्याशिवाय हे युद्ध कोणालाच बंद करता येईल असं वाटत नाही."

ब्रह्मदेवांची आज्ञा प्रमाण मानून अदिती आणि कश्यप रथात बसून रणांगणात आले. देवेंद्र आणि कृष्ण यांच्या मधे उभे राहिले. त्या दोघांना पाहून इंद्र आणि कृष्ण दोघांनीही आपापली शस्त्रे खाली ठेवली. त्यांना नमस्कार केला. अदिती त्यांना म्हणाली,

"अरे, तुम्ही दोघं भाऊ भाऊ आणि शस्त्रांचा उपयोग करून एकमेकांना मारण्यासाठी युद्ध करताहात? एखाद्या लहानशा गोष्टीचं निमित्त करून तुम्ही असं वागावं हे मला योग्य वाटत नाही. आणि प्रजापती ज्यांचा पिता आहे त्यांना हे शोभतही नाही. माझं सांगणं ऐकणार असाल तर मी सांगते त्याप्रमाणे करा."

"आज्ञा व्हावी माते. तुझ्या शब्दांबाहेर आम्ही कसे जाऊ? तुम्हा दोघांना इथे येण्याचे कष्ट दिले याबद्दल आम्हाला खरोखरच वाईट वाटते." कृष्ण आणि इंद्र दोघेही म्हणाले.

"कृष्णा, तुला पारिजात वृक्षच हवा आहे ना?"

"हो."

"मग तो घेऊन जा. पण एक लक्षात ठेव. तो स्वर्गीय वृक्ष आहे. केवळ सत्यभामेच्या हट्टासाठीच मी तो द्यायला

सांगत आहे. काही दिवस तो तुमच्या बागेत ठेवा पण त्यानंतर मात्र तो पुन्हा जागच्या जागी आणून ठेवायला हवा. मान्य आहे?"

"आज्ञा माते. तू म्हणतेस त्याप्रमाणे काही दिवसांनी हा वृक्ष मी पुन्हा नंदनवनात आणून ठेवीन. काही काळजी करू नकोस."

दोघांचे युद्ध संपले. त्यांनी एकमेकांना प्रेमालिंगन दिले. पुन्हा एकदा मातापित्यांना नमस्कार केला. मग इंद्राच्या आग्रहावरून कृष्ण, सात्यकी, प्रद्युम्न तिघेही त्याच्याकडे एक दिवस राहिले. विश्रांती घेतली. दुसऱ्या दिवशी कृष्ण पारिजात वृक्षासह द्वारकेला आला. त्या वृक्षाची स्थापना सत्यभामेच्या बागेत केली. तो वृक्ष पाहून आणि कृष्णाचे आपल्यावरील प्रेम पाहून सत्यभामेचा आनंद गगनात मावेना. ज्याला त्याला ती सांगत होती, 'ह्यांचं माझ्यावरच प्रेम आहे. अगदी रुक्मिणीदेवींपेक्षाही जास्त! अहो, देवींना यांनी पारिजातकाचे एकच फूल दिले आणि तेही नारदांनी दिलेले; पण माझ्यासाठी मात्र देवेंद्राशी युद्ध करून पारिजातकाचे झाडच आणले.' सर्वांशी बोलता बोलता पारिजातकाचा वृक्ष आपल्या बागेत आल्याच्या आनंदाची जागा अहंकाराने केव्हा घेतली हे सत्यभामेलाही कळले नाही. अहंकाराचा अंमल तिच्यावर वाढू लागला नि तिच्या वागण्या-बोलण्यात खूप फरक पडला. कृष्णाला हे जाणवत होते. वरकरणी तो सत्यभामेच्या आनंदात सहभागी होत असतानाच मनातल्या मनात मात्र तिला हसत होता.

❀ ❀ ❀

# सुवर्ण तुला

ब्रह्मवीणेचे मंजूळ स्वर सत्यभामेच्या कानावर आले. पाठोपाठ 'नारायणऽऽ नारायण' नामस्मरणाचे मंजूळ स्वर ऐकू आले. सत्यभामा आपल्या सखीला म्हणाली,

"मधुरिके, अग नारदमुनी आलेले दिसतात."

"आजचा दिवस भाग्याचाच म्हटला पाहिजे. आज सज्जनांचा सहवास मिळणार तर ...."

"हो ना! पण आज सकाळी सकाळीच इकडे कसे आलेत कुणास ठाऊक?"

त्यांचे बोलणे चालू असतानाच नारद आले. ते आत येताच सत्यभामेने त्यांना नमस्कार केला. तिच्याबरोबरच मधुरिकेनेही नमस्कार केला. नारदांनी आपला हात उंचावून त्यांना आशीर्वाद दिला,

"आयुष्मान भव. सुखी भव."

आशीर्वाद ऐकून मधुरिका म्हणाली,

"मुनिवर, आपला आशीर्वाद आणि बाईसाहेबांचं साहचर्य असल्यावर कोण सुखी होणार नाही?"

"छान! म्हणजे तुम्ही दोघी सुखी आहात, समाधानी आहात हे ऐकून आनंद वाटला मला."

"मुनिवर, आपल्या दर्शनाने आम्हालाही आनंद झाला. आपल्या येण्यानें माझं मंदिर पवित्र झालं; पण आज असं सकाळी सकाळीच येणं केलंत?" सत्यभामेने विचारले.

"सहज आलो...."

"तुम्ही आणि सहज?"

"का? नारदाने कधी सहज येऊच नये वाटतं? मी आलो की सगळ्यांना वाटतं आला भांडणं लावायला ....."

"तसं नाही हो! पण सकाळीच आलात म्हणून विचारलं?"

"समुद्रकिनारी स्नान-संध्या आटोपली. तेवढ्यात कृष्णाची आठवण झाली; म्हटलं येथपर्यंत आलोच आहोत तर कृष्णाचं दर्शन घेऊन जावं."

"म्हणजे, यांच्याकडे स्वारी आलीय तर .... तरी म्हटलं माझ्याकडे कसे?"

"फक्त कृष्णाकडेच नाही. तुझ्यावरचं त्याचं प्रेम सर्वश्रुतच आहे. तो तुझ्याचकडे असणार तेव्हा तुझंही क्षेमकुशल विचारता येईलच; म्हणून तर तुझ्या महालात आलो."

"मुनिवर्य, आमच्या बाईसाहेबांच्यावर महाराजांचं अगदी खरंखुरं प्रेम आहे हं! रुक्मिणीबाईसाहेब नुसत्याच पट्टराणी; पण, खरी मर्जी आमच्या बाईसाहेबांच्यावरच!"

"अग, हे काय सांगायला पाहिजे?"

"मधुरिके, गप्प बस पाहू? मला नाही बाई हे बोलणं आवडत..."

"यात न आवडण्याजोगं काय हो आहे? खरं ते सांगितलं. नारदमुनी कुणी परके का आहेत?"

"हो ना .."

"बरं का मुनिवर्य, महाराजांचं बाईसाहेबांच्यावरचं प्रेम पाहिलं की, असं वाटतं त्यांच्यावर पारिजातकांच्या फुलांची वृष्टीच होत आहे."

"सत्यभामे, बरं झालं. पारिजातकावरून आठवण झाली. तुझ्या बागेतलं पारिजातकाचं झाड पाहून संतोष वाटला.

मला वाटलं होतं, ते झाड बहुतेक रुक्मिणीच्याच बागेत जाईल."

"मी बरं जाऊ देईन. म्हटलं माझ्या हट्टासाठी आलाय पारिजातक!"

"तुझ्या हट्टासाठी? तो कसा काय?"

"काही वेळेला तुम्ही अगदी वेड घेऊन पेडगावलाच जाता बरं का? आठवतं का तुम्हाला?"

"काय ..?"

"मागे तुम्ही यांना एक पारिजातकाचं फूल दिलं होतं."

"बरं, मग?"

"त्यांनी ते मला न देता रुक्मिणीबाईंना दिलं. त्या वेळी केवढा गर्व झाला त्यांना?"

नारद स्वत:शीच म्हणाले, "रुक्मिणीला गर्व कधीतरी होईल काय? स्वत:च्या रूपाने ही फार आढ्यताखोर बनली आहे. रुक्मिणीचा सतत मत्सर करीत असते, खरंच, दुसऱ्याचा मोठेपणा आणि दुसऱ्याचं सुख सहन न होणं म्हणजेच मत्सर! पण तिला हे कळत नाही की, आपण आपल्या सौख्याच्या, सौंदर्याच्या श्रेष्ठतेच्या विशिष्ट कल्पना करून घेतल्यानें मनात मत्सर निर्माण होतो. ठीक आहे. कृष्णानं सांगितल्याप्रमाणे रुक्मिणीच्या निष्काम प्रीतीचे व निष्काम भक्तीचे माहात्म्य हिला पटविलेच पाहिजे. हा पारिजातक त्यासाठी बरा आहे." ते उघड म्हणाले,

"असं, असं, म्हणजे गर्वाचं घर खाली करण्यासाठी तू या पारिजातकाच्या झाडाचा हट्ट धरला आणि कृष्णानं तो पुरविला. असंच ना?"

"अगदी बरोबर. मुनिवर त्यांचं माझ्यावर किती प्रेम आहे म्हणून सांगू?"

"असं ..."

"हो ना. अहो, तुम्ही दिलेल्या फुलावरून केवढं वादळ झालं. मी रुसून बसले. ते पाहताच, माझ्या हट्टासाठी त्यांनी देवेंद्राबरोबर युद्ध करून हा स्वर्गीय वृक्ष आणला आणि माझ्या बागेत लावला. बघा ना कसा फुलला आहे. त्या फुलांचा तो धुंद वास ...."

सत्यभामा फुलांच्या त्या वासाने मोहून गेली. तिचे डोळे मिटले गेले नि एका वेगळ्या भावविश्वात ती वावरू लागली. तिला भानावर आणीत नारदमुनी म्हणाले,

"सत्यभामे तुझ्या बागेतला तो पारिजातक मी पाहिला; पण तो पाहून कृष्णाचं तुझ्यावरच फार प्रेम आहे, हे काही पटत नाही मला."

"का ..?"

"तूच बघ म्हणजे झालं.."

"म्हणजे काय? मला नाही बाई काही समजत. सरळ सांगा ना काय ते."

"हेच पाहा, झाड तुझ्या बागेत अन् त्याच्या फुलांचा सडा मात्र रुक्मिणीच्या बागेंत. मग कृष्णानं तुला काय दिलं? फक्त खोड?"

सत्यभामेने महालाच्या खिडकीतून डोकावून पाहिले, अन् ती म्हणाली,

"अगबाई, खरंच की, माझ्या लक्षातच आलं नाही. मला फसवलं की काय? आता येऊ दे यांना, विचारतेच

कशी ?''

ठिणगी पडली आहे, असे पाहून नारदाने पाय काढता घेतला. सत्यभामा रागाने धुसफुसायला लागली. ''रुक्मिणीइतकं प्रेम आपल्याला मिळत नाही,'' या कल्पनेने ती मत्सराग्नीत जळू लागली. वास्तविक श्रेष्ठतेचे विविध पर्याय असू शकतात. प्रत्येकाने आपल्या श्रेष्ठतेचा पर्याय शोधावा. त्यात हिमालयाची उंची गाठण्याचा प्रयत्न करावा; म्हणजे मत्सर आपोआप कमी होईल.

पण सत्यभामेसारख्या उथळ विचाराच्या स्त्रीला हे कसे कळणार ? सौंदर्याच्या अहंकारात ती बुडलेली होती. अहंकाराने, आढ्यतेने माणूस आत्मकेंद्रित बनतो. आणि असा माणूस दुसऱ्याला प्रेम देऊ शकत नाही. प्रेमाला हवा असतो त्याग ! हवी असते सहिष्णुता ! म्हणूनच आत्मकेंद्रित माणसं प्रेमाचे दान कधीच देऊ शकत नाहीत.

कृष्णाला ती खरे प्रेम देऊ शकत नव्हती; उलट आपल्या सौंदर्यपाशात त्याला बद्ध करू इच्छित होती. भक्तीच्या प्रेमरज्जूंनी जखडलेला भगवान या बाह्य देखाव्याला कसा भुलणार ? हे तिला कळत नव्हते; म्हणूनच कृष्ण महालात आला तरी सत्यभामा रागावलेलीच होती. रागरंग पाहून कृष्णाच म्हणाला,

''आज, एक माणूस रागावलेलं दिसतं आहे.''

सत्यभामा तशीच बसून होती. आणखी नापसंती दर्शविण्यासाठी तिनं ठसक्यात मान दुसरीकडे वळविली.

''हं, म्हणजे, बराच राग वाढलेला दिसतोय. बोलायचंसुद्धा नाही वाटतं.''

''मी कशाला बोलू ....?''

‘‘मग कोण बोलणार ..? पण राणीसरकार, रागाचं कारण तरी कळू द्या.’’

‘‘कारण काय असायचंय! एकीचा सांडा अन् एकीचा मांडा करायची सवयच लागली आहे तुम्हाला. एवढं जर तिकडं प्रेम होतं तर माझ्याशी लग्नच कशाला केलं?’’

‘‘म्हणजे काय ..? काही समजलं नाही.’’

‘‘कशाला समजेल. एवढं प्रेम तिकडं आहे तर तिकडंच का राहात नाही? माझ्याकडे नुसतं येऊन माझ्या रूपाची स्तुती करायची. मला भुलवायचं अन् प्रेम मात्र तिकडं.’’

‘‘म्हणजे रुक्मिणीविषयी चाललेलं दिसतंय. तिच्याविषयी काय सांगतेस? ती कधी तुझ्याबद्दल सांगते का? असा मत्सर करू नये. तू रूपानं सुंदर; पण तिनं कधी तुझा मत्सर केलाय? पण तू .....? तू मात्र तिचा मत्सर करतेस. ज्यांना स्वत:ला मोठं होता येत नाही ते दुसऱ्याचा मत्सर करतात.’’

‘‘घ्या तिची कड. माझं मोठेपण तुम्हाला नको आहे ना.’’

‘‘अग, पण झालं काय ते तर सांगशील? तिनं केलं काय?’’

‘‘केलं तिनं नाही. तुम्हीच केलंत सारं.’’

‘‘म्हणजे मी काय केलं बुवा?’’

‘‘मलाच विचारा.. का हो, मी विचारते, हा पारिजातक कुणासाठी आणलात?’’

‘‘राणीसरकार हे काय विचारणं झालं? तुझ्यासाठी! तुझ्यावरच्या प्रेमाचं प्रतीक आहे ते.’’

"वा, काय पण साखरपेरणी. या भूलथापांनी मी फसायची नाही. का हो, एक सांगाल का? माझ्यासाठी ते झाड आणलंत. अन् मला दिलंत काय, त्याचं खोड? कपाळावर मारायला? म्हणे तुझ्यासाठी हा आणलाय! झाड मला आणि फुलं रुक्मिणीला. अशी विषम विभागणी करायची. कळ लावायची. अन् मग मजा बघायची!"

"म्हणजे मी मजा बघतो."

"मला काही सांगू नका. मला फुलं मिळाली पाहिजेत."

"नाही कोणी म्हटलं?"

"नाही कोणीच म्हणत नाही; पण कृती फक्त उलटी! मला वाटत होतं तुम्ही संसारात तरी सरळ असाल. इथंतरी आत एक बाहेर एक असं नसेल; पण छे, तुमचे गुण काय लपणार आहेत?"

"अग..अग एकदम इतकं बोलू नये? बरं, सांग. काय करू म्हणजे राणीसरकारांचा राग जाईल?"

"काही करू नका .. जोपर्यंत माझ्या दारी त्या फुलांचा सडा पडणार नाही, तोपर्यंत माझं तोंड पाहू नका. रुक्मिणीबाईंना एकही फूल मिळता कामा नये. असं झालं तरच मी तुमच्याशी बोलेन."

"बरं बुवा, म्हणजे तोपर्यंत आम्हाला तुमचा महाल वर्ज्य आहे, असंच म्हणायचं ना तुम्हाला! जशी तुमची इच्छा. मग जाऊ आम्ही."

"हं, नाहीतरी मलाच विचारून जाणार आहात. खुश्शाल जा. 'त्या' तिकडे 'प्रेमानं' तुमची वाट पाहत असतील ना! उशीर होईल.."

महालातून जाताना कृष्णानं विचार केला. "ठीक झालं. नारदानं या नाटकाचा पूर्वार्ध तर छान जमवलाय. मात्रा कशी बरोबर लागू पडलेली दिसते. आता मलाच काही दिवस सत्यभामेचा महाल वर्ज्य केला पाहिजे. ही रूपसुंदरा, निर्मत्सर असती तर....? तसं नसतं, एवढं खरं. या उलट रुक्मिणीचं, श्रेष्ठ, गुणवान .... आत्मविश्वासू अशी माणसं कधी मत्सर करीत नसतात. म्हणून रुक्मिणीचं खरं प्रेम दाखवून हिला निर्मत्सर करणं हाच यावर उपाय आहे म्हणायचा!"

कृष्णानं निश्चय केला आणि तो महालाबाहेर पडला. सत्यभामेला ही कल्पनाही नव्हती. तिला वाटलं होतं कृष्ण आपली आणखी समजूत घालील. समजूत घालणारं जर कोणी आपलं माणूस असेल तरच रागावण्यात काही अर्थ असतो.

बराच वेळ ती त्या अवस्थेत होती. काही वेळाने तिचा राग शांत झाला.

दिवस उलटू लागले. तिची खात्री होती की, आज ना उद्या 'ते' येतील. जातात कुठे? माझ्या रूपानं ते विद्ध झालेले आहेत.

पण सत्यभामेची समजूत चुकीची ठरली. दोन-तीन दिवस झाले तरी कृष्ण आला नाही. रागाची जागा हुरहुरीने घेतली. तिला चैन पडेना, आणखी दोन दिवस गेले. बेचैनी आणखी वाढली. अस्वस्थता वाढली. आणखी एक-दोन दिवस गेल्यावर मात्र तिला राहवेना. ती मधुरिकेला म्हणाली,

"सखे, हे खरंच माझ्यावर रागावले असतील का ग?"

“नाही, बाईसाहेब, कामामुळे कदाचित येता आलं नसेल. येतील एक-दोन दिवसात.”

“नाही ग! मला तसं वाटत नाही. माझं मन त्यांना पाहण्यासाठी व्याकूळ झालं आहे. सांग मी काय करू? काही कळत नाही.”

“धीर धरावा बाईसाहेबांनी.”

“धीर धरू ....? सखे, तूच सांग; कसा धीर धरू? अग, अंत:करणात दडलेल्या दु:खाचं शल्य दु:खितालाच कळतं. दुसऱ्याला त्याचं काय? जिवंत सरणावर चढणाऱ्या सतीची वेदना इतरांना कशी कळणार?”

“खरं आहे बाईसाहेब. मला वाटतं ...”

“काय वाटतं तुला? यावर काही उपाय ... सांग सखे, सांग ... मग तो कितीही कठीण असू दे. मी करीन. सांग ...”

“बाईसाहेब, पार्वतीनं शिवपूजेनं, शिवभक्तीनं जसं त्यांना जन्मजन्मांतरीचं ऋणी करून ठेवलं, तसं तुम्ही शिवाचं पूजन करा; म्हणजे महाराज या जन्मात तर तुमचे राहतीलच; पण जन्मोजन्मी तुमचेच राहतील.”

“खरंच, मग मी हा उपाय करीन. शंकराला अगदी सोन्याची बिल्वदलं वाहीन. लागलं तर रोज उपवास करून ....”

“कोणाला उपवास करायची वेळ आली आहे? सोन्याचा बिल्वदलं शंकराला कशासाठी वाहणार आहेस सत्यभामे?” नारदांनी प्रवेश करतच विचारले. अकस्मात नारद आलेले पाहून दोघीही आश्चर्यचकित झाल्या. त्यांनी स्वत:ला सावरीत

त्यांना बसायला आसन दिले. नमस्कार करीत सत्यभामा म्हणाली,

"मुनिवर्य, त्या दिवशी तुम्ही गेलात; नंतर 'हे' आले होते. पारिजातकावरून मी यांना नको नको ते बोलले. ते रागावून निघून गेले, ते अद्याप इकडे आलेच नाहीत. मन कसं व्याकूळ झालं आहे; त्यांना पाहायला."

"असं असं, म्हणून शिवभक्तीचा हा घाट होय? उत्तम...उत्तम! पण सत्यभामे, ही शंकरभक्ती पूर्ण केव्हा होणार? शंकर प्रसन्न कधी होणार? अन् मग कृष्ण तुला केव्हा मिळणार? उपाय कसा झटकन फळ देणारा पाहिजे."

"मुनिवर्य, तुम्ही सांगा ना एखादा उपाय. कितीही कठीण असला तरी चालेल हो! पण ते मलाच मिळाले पाहिजेत. अगदी जन्मोजन्मी!"

नारदांनी विचार केल्यासारखे दाखविले. मग ते म्हणाले,

"आहे, एक उपाय आहे."

"कोणता ..?"

"हे बघ, आपण जे पेरतो तेच उगवतं! जे जे द्यावं ते ते मिळतं! तसं तू या कृष्णाचं दान एका सत्पात्र ब्राह्मणाला दे, म्हणजे तो तुझाच होईल. अगदी जन्मजन्मांतरी!"

"खरंच होईल तसं?"

"अगदी नक्की..."

"मग मुनिवर्य आपल्यासारख्या ब्राह्मणाशिवाय दुसरा सत्पात्र ब्राह्मण कोण मिळणार आहे? मी तुम्हालाच दान देते."

"छे, छे. मी तुला उपाय सुचविला. कृष्णाचं दान

घेऊन मी काय करू?"

सत्यभामेने खूप आग्रह केला. नाही ...हो करता-करता अखेर अगदी नाईलाज म्हणून आपण हे दान घेतो आहोत, असे दाखवीत नारदाने ते दान स्वीकारले व नारदांच्या हातावर सत्यभामेने उदक सोडून कृष्णाचं दान दिलं. एवढ्यात कृष्ण तेथे आला. सत्यभामेला आनंद झाला. तिला वाटलं हा या दानाचाच प्रताप! ती आनंदली, सुखावली, तोच नारद म्हणाले,

"कृष्णा, बरं झालं तू आलास. या सत्यभामेनं तुझं दान मला केलं आहे."

"खरंच नाथ. तुम्ही जन्मोजन्मी माझेच राहावेत म्हणून केलं."

"कृष्णा, आता बायकोशी गप्पा मारीत बसू नकोस. आता तू माझा दास झाला आहेस, घे ह्या चिपळ्या. ही वीणा घे अन् चल माझ्याबरोबर."

"म्हणजे, हे माझेच राहावेत म्हणून..."

"बस्स झालं, मूर्ख मुली. नवऱ्याचं दान कोणी दिलं होतं? अहंकार व मत्सरानं ग्रासलेल्या तुझ्या मनाला एवढं कळू नये?"

नारद कृष्णाला बळजबरीने नेऊ लागले. कृष्णाने गयावया करण्याचे, रेंगाळण्याचे नाटक उत्तम केले. सत्यभामा काकुळतीने विनवणी करू लागली. बराच वेळाने आपण उपकार करतो, अशा थाटात नारद म्हणाले,


"सत्यभामे, तुझ्या विनवणीने मी तुझा नवरा तुला परत देईन; पण एका अटीवर...,"

''कोणती सांगा. ती मी पूर्ण करीन.''

एव्हाना मधुरिकेकडून कृष्णाच्या इतर राण्यांना निरोप कळला. त्या साऱ्या धावत आल्या. आली नव्हती रुक्मिणी. तिला निरोप गेला नव्हता. इतर राण्यांनी सत्यभामेची खूप निर्भर्त्सना केली. त्याने ती मेल्याहून मेल्यासारखी झाली. साऱ्याजणी नारदांची अट ऐकायला उत्सुक होत्या.

''कृष्णाच्या भारंभार मला सोने मिळाले; तर मी कृष्णाला तुझ्या हवाली करीन.''

सत्यभामेच्या दृष्टीने ही अट सोपी होती. तराजू आणला गेला. एका पारड्यात कृष्ण बसला. सत्यभामा सोने घालीत



होती. तुला होत नव्हती; तिचे सुवर्ण भांडार संपले. पण तुला झाली नाही. ती हिरमुसली. मग इतर सर्व राण्यांनी आपल्याकडचे सर्व सोने पारड्यात घातले. तरीही तुला झाली नाही. साऱ्याजणी सचिंत झाल्या.

हा प्रकार पाहणारी मधुरिका रुक्मिणीकडे गेली अन् घाबऱ्या घाबऱ्या म्हणाली,

"बाईसाहेब, तुम्ही आधी सत्यभामाबाईसाहेबांच्या महालात चला."

"अग पण काय झालं, ते तर सांगशील."

"ते मी जाताना सांगते, पण तुम्ही आधी चला."

रुक्मिणी पूजा करीत होती. देवाला वाहण्यासाठी तिने तुळशीपत्र हातात घेतले होते. हातातल्या तुळशीपत्रासह ती तेथे आली. सारा प्रकार तिने समजावून घेतला. नारदांना व कृष्णाला नमस्कार केला आणि तराजूजवळ जात ती म्हणाली,

"माझं यांच्यावर खरं प्रेम असेल, भक्ती असेल एवढंच नव्हे तर मी कोणाचाच मत्सर केला नसेल, तर या सद्भावनेच्या तुळशीपत्राने ही 'तुला' पूर्ण होवो."

सारे पाहत असतानाच, पारडे उचलले गेले. तुला पूर्ण झाली. सत्यभामेला आपली चूक कळली. त्या निष्काम भक्तीपुढे तीही नतमस्तक झाली. तिने रुक्मिणीला नमस्कार केला. तिला उठवीत रुक्मिणी म्हणाली,

"सत्यभामे, निर्मत्सर मनातच खरी भक्ती, खरं प्रेम वास करतं. निरपेक्ष नि निष्काम भक्तीच अंती इच्छित फल देऊ शकते. तू ह्यांना निरपेक्ष प्रेम दे. हे सर्वस्वी तुझेच राहतील.

❀ ❀ ❀

# खाशी खोड मोडली

राज्यवाढीच्या जबरदस्त लोभाने अल्लाउद्दीनशाह अस्वस्थ झाला होता. कोकणातले सर्व किल्ले आपल्या ताब्यात कसे येतील, याचा विचार त्याला वेडापिसा करीत होता. महालात संध्याकाळच्या वेळेला याच विचाराने बेचैन होऊन तो फेऱ्या मारत होता.

एकदा मनात यायचे, 'स्वत:च जावे अन् घ्यावेत सगळे किल्ले!' पण कोकणच्या मुलखासंबंधी मिळालेली माहिती डोळ्यांसमोर आली तरी त्याला भोवळ यायची. तिथे स्वारी करून हकनाक आपले प्राण गमवायला तो तयार नव्हता. आणि जवळ असा एकही सरदार नव्हता की, जो हमखास मोहीम फत्ते करील! अखेर त्याने ठरविले उद्या दरबारातच या विषयाचा सोक्षमोक्ष लावायचा. कोणाला तरी मधाचे बोट चाटवून स्वारीला तयार करायचे. काय वाटेल तो खर्च आला, कितीही सैन्य लागले तरी ही मोहीम आखायचीच!

दुसऱ्या दिवशी दरबार भरला; आणि सुलतान अल्लाउद्दीनशाह सानी याचा आवाज दरबारात घुमला,

"बस, कोकण के सभी किले हमारी सल्तनत में शामील होना चाहिए।"

त्याचे बोलणे हवेत निनादले पण दरबार मात्र शांत होता. कोणीच त्याला प्रतिसाद दिला नाही. साऱ्यांना कोकणची किमया माहीत होती. वाघाच्या गुहेत आपण होऊन कोण जाणार? सुळावरच्या पोळीची अपेक्षा कोण धरणार? पण सुलतानाला मात्र दम धरवत नव्हता. क्षणकाळाची शांतताही त्याला प्रहारासारखी वाटली. सगळे सरदार गप्प आहेत असे

५०
3003 ९०/८/८०

पाहून तो पुन्हा म्हणाला,

"क्यों, बोलते क्यों नहीं? इतना कठीन मामला है? अगर सभी किले हाथमें आ जायेंगे तो जिसने यह महत्त्वपूर्ण काम किया उसकी हिपाजत की जाएगी: उसका सम्मान किया जाएगा!"

सुलतानाचं भाषण ऐकून सरदार मलिक उत्तुजारचे बाहू स्फुरण पावू लागले. दरबारातल्या मानसन्मानाची स्वप्ने त्याच्या डोळ्यांसमोर तरळू लागली. क्षुद्र मोहांना क्षुद्र माणसेच बळी पडतात.

कोकणचे किल्ले आपण जिंकावेत आणि हा सन्मान आपण मिळवावा अशी इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली. कल्पनेने त्याने सारे किल्ले जिंकूनही टाकले. पाहण्याआधीच! लढण्याशिवाय!! सुलतानाला त्याने सांगितले,

"खाविंद, गुस्ताखी माफ हो। आपकी आज़ा मुझे मंजूर है। मैं कोकणके सभी किलोंपर कब्जा करूँगा।"

मलिक उत्तुजारची तयारी पाहून सुलतान सुखावला. त्याचा पराक्रम आणि क्रूरता दोन्ही सुलतानाला माहीत होती. त्यामुळे काय वाटेल ते करून साम, दाम, दण्ड, भेद यापैकी कोणत्यातरी उपायाने तो कोकणचे किल्ले घेईल असे त्याला वाटले.

अल्लाउद्दीनशाह आपल्याच आनंदात मश्गुल झाला. डोळे किलकिले करीत त्याचा हात दाढीवरून फिरू लागला. आपल्याच नादात मान डोलावत तो म्हणाला, "ठीक है .... ठीक है..."

निरोपाचे विडे दिले गेले. दरबार संपला.

मोहिमेची तयारी सुरू झाली. प्रचंड छावणी पडली. दहा हजार फौज निघाली. त्यात तीन हजार अरबी घोडेस्वार होते. गजगतीने फौज कोकणच्या दिशेने रवाना झाली. सह्याद्रीशी सामना करायला निघाली. सह्याद्रीशी झुंज म्हणजे जणू वादळवाऱ्याशी झुंज! वज्राशी संग्राम! उत्तुजारला याची काय कल्पना? तो दंग झाला होता भविष्यात मिळणाऱ्या मानसन्मानात! बादशहाने त्याला चाटवले होते लोभाचे बोट! त्याला कल्पना नव्हती की, एखाद्या वस्तूच्या अतिरिक्त आसक्तीत, लोभात एक विलक्षण शक्ती असते. ती सामान्य कुवतीच्या माणसालाही आकाशाला गवसणी घालायला लावते. क्षितिजाचा वेध घ्यायला लावते नि मृगजळाचा शोध घेण्याची भुरळ पाडते.

उत्तुजार सैन्याला आज्ञा देत होता. एक एक मुक्काम मागे पडत होता. त्याने आज्ञा दिली, प्रचीतगड! सारे सैन्य प्रचीतगडच्या रोखाने चालू लागले.

सह्याद्रीच्या बळकट आश्रयाने, प्रचीतगडच्या सान्निध्यात प्रख्यात शिर्के घराणे राहात होते. अत्यंत चिवट, मोडतही नव्हते आणि वाकतही नव्हते. सारा महाराष्ट्र सुलतानांच्या टापाखाली भरडून निघत असताना शिर्के ताठ मानेने राहिले होते. त्यांना वाकवायला, छे .... छे त्यांन मोडायला उत्तुजार निघाला होता. दहा-हजार फौजेनिशी! मूठभर मावळ्यांशी लढायला दहा हजार सैनिक!!

शिर्क्यांच्या हेराने बातमी आणली. तो म्हणाला,


"मलिक उत्तुजार दहा हजार फौजेनिशी आपल्यावर चालून येतो आहे. कोकणचे सगळे किल्ले काबीज करायचा

मनोदय घेऊन आला आहे.''

शिर्के हसले. खळखळून हसले. म्हणाले,

''ठीक आहे. येऊ द्या. बघू या आपल्यालाही काही जमलं तर, पाहुणे आले आहेत, समाचार घ्यायलाच हवा.''

शिर्क्यांनी आपली मूठभर फौज एकत्र केली. साऱ्यांना समजले आता दिवा वादळाचे युद्ध सुरू होणार! तरी कोणीही डगमगले नाहीत. घाबरले नाहीत. खरेच हिंमतवान! सगळे तयार झाले अन् त्यांना समजले उत्तुजार आला. अगदी नजदिक. आणखी नजदिक. आणि आता तर किल्ल्यालाच भिडला.



शिर्के सगळ्या हालचाली बारकाईने पहात होते. विचार करीत होते, ''हे सारे राज्याला हपापलेले. जरा कुठे फायदा दिसला की, वाटेल ते करायला तयार होणारे. लोभी! यांना

जरा कोकणचा इंगा दाखवलाच पाहिजे.''

''आमचे महाराज तुमचं सैन्य पाहून घाबरले आहेत. ते तुम्हाला शरण येत आहेत. त्यांच्या जीवाला धोका पोहोचणार नसेल तर ते जातीनिशी आपल्याला भेटू इच्छितात.''

निरोप ऐकून उत्तुजार तर सर्दच झाला. ''लढाईशिवाय विजय! किती आनंदाची गोष्ट! असंच सगळीकडे झालं तर...तर....'' झालेला आनंद दडवून ठेवत तो उद्गारला.

''बहुत खूब...बहुत खूब..,..हम उनको मिलनेके लिये तैय्यार हैं। उनका बाल भी बाँका नहीं होगा।''

वकील शिर्क्यांच्याकडे गेला आणि थोड्याच वेळात शिर्के मलिक उत्तुजारकडे आले. शरण आले. आजपर्यंतची ताठ मान लवली. मलिक खूष झाला. बेहद्द खूष झाला.

''आइये, शिर्केजी आइये, तुम्हे देखकर दिल खूष हो गया!''

दोघांची बोलणी सुरू झाली. आस्ते, आस्ते मलिकने आपले म्हणणे मांडायला सुरुवात केली.

''अब तुम हमारे कब्जे में हो। आपका किला भी हमारा हो गया है।''

''अलबत!''

''हमने आपके वकीलसे कह दिया है कि तुम्हारा बाल भी बाँका नहीं हो जाएगा!''

''आपका एहसान है!''

''हाँ....जरूर....लेकिन एक शर्त है!''

''शर्त? किला तो आपके हाथमें है अब फिर कौनसी

शर्त है? बताइये....''

''अगर तुम मुस्लिम धर्मका स्वीकार करेंगे तो तुम्हारी जान बच जाएगी! अगर तुमने नहीं मान लिया तो...''

''खानसाब, जरूर....जरूर आम्ही आपला धर्म स्वीकारू.''

मलिक त्याच्याकडे पाहातच राहिला. 'शिर्के अन् मुस्लीम धर्म स्वीकारणार....?' ज्या गोष्टी स्वप्नातसुद्धा पाहिल्या नव्हत्या त्या तो प्रत्यक्ष अनुभवीत होता. त्यावर त्याचा विश्वासच बसत नव्हता. तो पुन्हा म्हणाला, क्या, तुम हमारे धर्मका स्वीकार करेंगे!''

''जी, हाँ.....पण खानसाहेब एक मुसीबत है!''

''बोलो....''

''मी तुमचा धर्म स्वीकारीन, पण कोकणात त्या खेळणागडावर शंकरराय मोरे नावाचा सरदार आहे. तो फार त्रास देतो, मी जर मजहब बदलला तर तो मला त्रास देईल. मला जगणं कठीण होईल. आपण एक कराल का?''

''बताओ.....क्या करेंगे?''

''आपण आधी त्याचा धर्म बदलू. मग मीही तुमचा धर्म स्वीकारतो. मी माझ्या सैन्यासह त्याच्याकडे येतो. आपलं दोघांचं सैन्य गेलं की तो घाबरून शरण येईल.''

शिर्क्यांची कल्पना मलिकला आवडली. पटली. आज तो खुदाला लाख लाख धन्यवाद देत होता. एवढे यश मिळेल याची त्याला कल्पनाही नव्हती.

''खेळणागड मिळणार, दोन मराठे सरदार आपल्या

धर्मांचे होणार!" मलिकच्या आनंदाला सीमा राहिली नव्हती. लोभाने तो ग्रासला जात होता. यश...आणखी यश...हेच त्याला हवे होते. लोभी माणूस सतत अतृप्तच असतो.

शिर्क्यांच्या मनसुब्याला मलिकने संमती दिली. त्याच्या इशाऱ्यावर सैन्य पुन्हा निघाले. खेळण्याकडे! कोकणातला मुलूख कसा असतो याची जाणीव सैन्याला झाली होती. काहींनी तिकडे यायला नकार दिला; पण भावी स्वप्नांच्या हिंदोळ्यावर झुलणाऱ्या मलिकला त्याची पर्वा नव्हती. तो जाणत होता विजय आणि त्याने मिळणारा मान सन्मान! इतरांच्याकडे पाहायला त्याला वेळ होताच कुठे! लोभाने अंधळ्या झालेल्या माणसाला इतरांच्या सुखदु:खांकडे लक्ष द्यायला वेळच नसतो. त्याला दिसत असतो तो फक्त स्वार्थ!

मलिक शिर्क्यांच्या मदतीनं मोऱ्यांना जिंकू इच्छित होता.. एका घावात दोन पक्षी! शिर्क्यांनी दाखवलेल्या प्रलोभनाला बळी पडला होता. लोभाने पछाडला होता. लोभ हे एक विचित्र विष बीज आहे. ते एकदा पेरले की, हा हा म्हणता त्याचा मोठा वृक्ष होतो. आणि मग त्या वृक्षाची कडू फळे हाताखालच्या साऱ्या माणसांना चाखावी लागतात.

सगळे सैन्य निघाले. निघण्यावाचून गत्यंतरच नव्हते.

शिर्के वाट दाखवीत होते. सैन्य पुढे जात होते. पहिले दोन दिवस त्या मानाने वाट सोपी होती. खरे म्हणजे कोकणचा मुलूख फार विकट; पण त्यातल्या त्यात ही वाट सोपी होती. पुढे दोन दिवसानंतर मात्र शिर्क्यांनी अशा गर्द झाडीतून सैन्याला न्यायला सुरुवात केली की, सैन्याला पाऊल पुढे टाकणे मुष्कील झाले. त्या गर्द झाडीतून अनेक वाटा इकडे

तिकडे जाताना दिसत होत्या. वाकडच्या तिकडच्या वाटा. कुरळ्या केसांसारख्या! डोंगरांनी धारण केलेले रौद्र स्वरूप! पाताळापर्यंत गेलेल्या दऱ्या आणि सरळसोट सुटलेले कडे पाहून तर प्रत्यक्ष राक्षसच आपल्यापुढे उभे असल्यासारखे वाटू लागले.

घनघोर अरण्य! आकाशापर्यंत वाढलेले वृक्ष! सूर्याच्या किरणांचा कवडसाही जमिनीवर पडत नव्हता. सोसाटयाचा वारा! झाडे करकरा लवायची. गवतांची पाती गदगदा हलायची. गवतही सापाच्या विषारी दाताप्रमाणे तीक्ष्ण. गवतालाही भाले फुटलेत असे वाटायचे. अंगाला टोचायचे. आणि हवा....हवा अजगराच्या श्वासासारखी! मृत्यूचेच जणू तांडव चाललेले! अशा भयानक वाटेने मलिक जात होता. खेळण्यावर! शंकरराय मोरेला जिंकायला! दरबारी मानसन्मान मिळवायला!

नाइलाजाने सैन्य पुढे सरकत होते. पुढे तर इतक्या बिकट जंगलात सैन्य आले की; त्यांना हुकूम देणेही कठीण झाले. तिन्ही बाजूला उंच उंच पहाड, वाऱ्यालाही फिरकायला मोकळी जागा नव्हती; मग तंबू तरी ठोकणार कुठे नि कसे? सैन्याला धड चालताही येत नव्हते. ते आला दिवस पुढे ढकलत होते; आणि अजून तो खेळणागड आणि शंकरराय मोरे किती दूर होता हे खुदा जाणे! मलिकचे सैन्य जीव मुठीत धरून तिथे राहिले होते.

आणि शिर्के....

रात्रीने काळोख पसरला आणि शिर्के गुपचूप निघाले. कोठे....? शंकररायकडे. खेळण्यावर! आडवाटेने ते खेळण्यावर आले. अजून फार रात्र झाली नव्हती. शंकररायाच्या महालात

शिर्के आलेले पाहाताच त्यांनाही आश्चर्य वाटले. मोठ्या प्रेमाने स्वागत करून ते म्हणाले,

"आज असं रातच्या पारी येणं केलं. काही विशेष?"

"हां, सावज सापडलं म्हणून घेऊन आलो."

"म्हणजे..."

"सुलतानानं मलिक उत्तुजारला पाठवलंय कोकणावर! म्हणे सगळे गडकोट घ्यायचे आहेत त्याला."

"मग..."

" तो माझ्याकडे आला. म्हणाला, "आमचा धर्म स्वीकारीत असशील तर जिंदा सोडतो." मी म्हटलं "तयार आहे."

"काय....?"

"पुढलं तर ऐका, मी तुमचा धर्म जरूर स्वीकारतो; पण खेळण्यावर शंकरराय मोरे आहे, तो मला त्रास देईल. तेव्हा आपण आधी त्याला आपल्या धर्मात घ्या. मग मी स्वीकारतो."

"छान हाय.."

"नाही तर काय? तो लोभी झाला की तयार इकडे यायला. असा आडवाटेनं आणला की त्याचा निम्मा जीव आत्ताच खतम झालाय. आता राहिलेला तू खतम कर."

"वा...वा. भले शाबास!"

मोरे खळखळून हसले. हास्याचे ध्वनी हवेत विरले व मग ते म्हणाले,

"अरे, पण आलाय कुठपर्यंत?"

"या इथं. दोन मैलावर तर आहे. आता गाढ झोपला

असेल. रात्रीच्या रात्रीच सगळं आटोपलं पाहिजे. मी मागल्या बाजूने आहेच. तू इकडनं हल्ला कर. बक्षीस दिलंच पाहिजे. आमचे गडकोट जिंकणं म्हणजे काय सुरईतली दारू पिण्याइतकं सोपं आहे? सुलतानाला चांगली अद्दल घडवली पाहिजे. म्हणजे पुन्हा नाही वाकडा डोळा करून पाहायचा इकडं."

शंकररायला शिर्क्यांची मसलत पटली. आधीच ते सुलतानावर रागावलेले होते. त्यात ही सोन्यासारखी संधी चालून आली. ती काय फुकट दवडायची?

शिर्क्यांनी विचारले,

"मग, निघू मी..? आता भेट नंतर. आणखी दोन प्रहरांनी तयार राहतो."

शंकररायने संमती दिली. 'निघतोच लगोलग. तू मातर तयार राहा' असे सांगितले.

शिर्के अंधारात दिसेनासे झाले. खेळण्यावर रणशिंग फुंकले गेले. मराठ्यांची माकड-फौज उड्या मारतच एकत्र झाली. पाच-सहा हजार फौज हा हा म्हणता जमा झाली. शंकररायाचे बाहू स्फुरण पावत होते. सुलतानाबद्दलचा संताप आधी मनात, आणि नंतर डोळ्यांत उतरला होता. त्यांनी फौजेला इशारा केला. घोड्यावर मांड पडली आणि विजेच्या चपळाईने आणि वाऱ्याच्या वेगाने फौज उत्तुजारवर निघाली.

उत्तुजारला काहीही कल्पना नव्हती. दमली भागली फौज मिळेल त्या जागेवर विश्रांती घेत, गाढ झोपेत होती. वारा जोराने वाहात होता. फांद्या एकमेकांवर घासून प्रचंड आवाज करीत होत्या.

इतक्यात शंकरराय फौजेनिशी आला. धावत आला.

शिर्के तयार होतेच. एकदम धाड पडली. मराठ्यांनी उत्तुजारच्या फौजेला मेंढ्यासारखं कापायला सुरवात केली. मलिकच्या फौजेला सावध व्हायला संधीही मिळाली नाही. मराठ्यांच्या प्रचंड हल्ल्यापुढे ते सारखे पटापट मरत होते. घाल घाव की तोड मुंडके! जणू रणचंडीचेच थैमान चालू होते. आक्रोश उठला. गोंगाट झाला. किंकाळ्यांनी अरण्य भरून गेले; पण जंगलातील वाऱ्याच्या सैतानी वाहण्याने, झाडांच्या करकरा आवाजाने आणि निसर्गाच्या रौद्र रूपाने सैनिकांचा आवाज ऐकूही येत नव्हता.

दिवस उजाडायच्या आत दहा हजार सैनिकांसह मलिक उत्तुजार त्या अरण्यात ठार झाला. पार बुडाला.

शिर्के आणि मोरे दोघांनी सुलतानाची खाशी खोड मोडली. विजयश्रीने त्यांना माळ घातली. दोघेही आनंदित होते. एकमेकांना त्यांनी कडकडून मिठी मारली. निरोप घेतला नि विजयी फौजेसह दिवस उगवायच्या आत आपापल्या मुक्कामी गेले.

चुकून वाचलेले एकदोन जखमी सैनिक धावत पळत सुलतान अल्लाउद्दीनशाहकडे कसेबसे पोचले. तो मनात मांडे खात बसला होता. 'मलिकसारखा शूर आणि क्रूर सरदार आपण कोकणात पाठवला आहे, म्हणजे कोकणचे गड-कोट आपलेच!' त्या सैनिकांचा तो अवतार पाहून अल्लाउद्दीन ओरडला, -

'क्या हुवा....?''

सैनिकांच्या तोंडातून शब्दही फुटत नव्हता, एवढे ते घाबरले होते. कसे तरी शब्द गोळा करीत ते म्हणाले,

"खाविंद, ये मराठे सैतान है । उन्होंने हमारे सब सैनिक, हमारे सेनापती मलिकके साथ खतम किये - सिर्फ हम बचे हैं!"

बातमी ऐकताच अल्लाउद्दीनशाह रागावला. खूप रागावला आणि हातांची बोटे मोडीत म्हणाला,

"ये खुदा! ये क्या हुआ...? अब मेरी सल्तनत कैसी बढेगी...?"

❀ ❀ ❀

# स्वातंत्र्यप्रीती

मानसिंग...! अकबराचा सेनापती.....रजपुतांच्याच रक्ताचा पण त्यांच्यावर उलटला. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ...!!

मानसिंगाची आठवण होताच राणा प्रतापचा राग अनावर झाला. संतापाने चेहरा लालबुंद झाला. हाताच्या मुठी वळल्या. नकळत त्याच्या तोंडून शब्द गेले, "कृतघ्न...! हरामखोर...!! आमच्या कृपेनं जिवंत राहून आमच्यावरच उलटला...." विचारचक्र वेगाने फिरत होते आणि डोळ्यांसमोर तरळत होते हळदीघाटीचे दृश्य !!

हळदीघाटीच्या युद्धापूर्वीची घटना. मानसिंग आपल्या हत्तीवरून एकटाच हिंडत होता. हळदीघाटातील सौंदर्य आपल्या डोळ्यांत साठवीत होता. निसर्गाची ती रूपमाया त्याला उल्हसित करीत होती. एका वेगळ्या दुनियेत घेऊन जात होती. त्या आनंदाच्या क्षणात तो देहभान विसरला होता. 'आपण अकबराचे सेनापती आहोत, शत्रूच्या मुलखात आहोत, सेनापतीने असे एकटे, बेसावधपणे फिरणे अयोग्य आहे...' हे सारे विसरला होता; आणि धुंद होऊन फिरत होता.

राण्याच्या सैन्याला बातमी कळली. विजेच्या वेगाने सैनिक तेथे पोहचले. त्याला गिरफ्‌दार केले. राण्यापुढे उभे केले. तो प्रसंग डोळ्यांसमोर आला नि त्याच्या मनात आले,

'आमचंच चुकलं; पण आम्हाला काय कल्पना की, हा कृतघ्न असेल ? वाटलं होतं उपकाराची जाणीव ठेवील. आमच्यामुळे जीव वाचला याची जाणीव मनात ठेवून तो काहीतरी कारण सांगून ही मोहीम बंद करायला अकबराला

भाग पाडील. पण छे! उपकाराचं स्मरण तर राहिलं बाजूला, अन् आमच्या कमकुवतपणावर नेमकं बोट ठेवून आमचा पराभव केला. आमचं राज्य हिरावून घेतलं...

शत्रूवर आम्ही तरी विश्वास कसा ठेवला. सापाला कितीही दूध पाजलं तरी तो काय अमृत ओकणार आहे? त्या वेळी लक्षात यायला हवं होतं. ज्या हत्तीवरून तो दिमाखाने चालला होता त्याच हत्तीच्या पायी त्याला का दिलं नाही? तलवारीच्या एका फटकाऱ्यासरशी त्याचं मस्तक धडावेगळं का केलं नाही? मुसक्या बांधून त्याला कायमचं कैदेत का टाकलं नाही? का ऽऽ का?

शूर कधी बेसावध शत्रूवर हल्ला करीत नाहीत. त्याला सावध करून मग त्याच्यावर हल्ला करतात ... हे आमचं तत्त्व आड आलं. त्यामुळे आमच्या सांगण्यावरून सैनिकांनी त्याला सोडलं. जीवदान दिलं.'

कितीतरी वेळ तो आपल्याशीच विचार करीत होता. एवढ्यात एक थंड वाऱ्याची बोचरी झुळूक त्याच्या अंगावरून गेली. त्याने तो भानावर आला.

रात्र बरीच वाढली होती. शुद्ध पक्षातल्या पंचमी-षष्ठीची चंद्रकोर पश्चिमेला झुकली होती. झाडांच्या अस्पष्ट छाया दूरवर पसरल्या होत्या. एकमेकांत मिसळून त्यांचे जाळे तयार झाले होते. मधूनच वाऱ्याची झुळूक यायची. झाडे शहारायची अन् सावल्याही! अरवली पर्वताची दूरवर पसरलेली शिखरे त्या शांत, निरामय वातावरणात भोवतालच्या प्रदेशावर गस्त घालीत होती. रातकिडयांचे भेसूर आवाज आणि मधूनच येणाऱ्या हिंस्र श्वापदांचे आवाज जंगलातील शांततेचा भंग करीत होते. आणि राणा प्रताप आपल्या पत्नी, मुलीसह

त्या पर्वतराजीच्या कुशीत, भयाण जंगलात एकं झोपडी बांधून राहिला होता.

अकबराने हळदीघाटाच्या युद्धात राणा प्रतापाचा पराभव केला होता. त्याचे राज्य गेल्यामुळे तो वनवासी झाला होता. जंगलात राहण्याचे त्याच्या नशिबी आले होते. आपले जीवन एकाकी घालवीत होता. एकटेपणात साथसंगत असते ती विचारांची. राणाही आपल्या झोपडीजवळच्या शिलाखंडावर विचार करीत बसला होता. मेवाडच्या स्वातंत्र्याचे विचार त्याच्या मनात सतत रुंजी घालीत असत. मेवाडच्या भवितव्याचे विचार त्याला अस्वस्थ करीत असत. ध्येयवेड्या माणसांच्या मनात त्यांच्या ध्येयाचेच विचार सतत घोळत असतात.

आज मानसिंगाचा विचार आला तोही मेवाड परतंत्र झाला म्हणून! त्याच्या कृतघ्नपणाने राज्य गेले नि त्याला वनवासी व्हावे लागले म्हणून! भानावर आलेल्या राण्याचा क्रोधाग्नी थोडा शांत झाला. विवेक जागा झाला नि शांत मनात पुन्हा विचार तरंग उमटले,

'अकबरानं आमचं राज्य हिरावून घेतलं, आम्हाला वनवासी बनवलं. पण यात आम्हाला वाईट वाटण्याचं काय कारण?

पांडवांना नाहीका वनवास सोसावा लागला. खरोखर महाकवीची प्रतिभा किती विलक्षण असते! मोठेपणा प्राप्त करण्याकरिता आधी वनवास सहन करावा लागतो, हे कटू सत्य किती छान उदाहरणाने त्यांनी पटवून दिले आहे. त्यांना वनवासी व्हावं लागलं होतं, तरी त्यांनी आपलं ध्येय सोडलं नव्हतं. आम्हालाही आमचं ध्येय सोडून चालणार नाही. मानसिंगावर दया करण्याची चुकून जी चूक झाली ती झाली. आता आमचं सामर्थ्य आम्हाला वाढविलंच पाहिजे. कारण,

नुसत्याच सदिच्छेने राज्यं चालत नसतात. त्याला शस्त्रांचं सामर्थ्य असावं लागतं. राज्य चालविताना 'बळी तो कान पिळी' हाच न्याय खरा ठरतो, हेच खरं! आम्हाला आमचं सामर्थ्य लवकरच वाढविलं पाहिजे. जोपर्यंत आमच्या हातात तलवार आहे, आमच्या भाल्याला शत्रूच्या रुधिराचीच ओढ लागली आहे, जोपर्यंत आमच्या नसानसात ज्वलंत रक्त सळसळत आहे, तोपर्यंत मातृभूमी स्वतंत्र करण्याकरिताच आमचे प्रयत्न होतील. त्यातच जीवनाची अखेर होईल. तेच आमचं ध्येय आहे. त्याकरिता आम्हाला श्रम केलेच पाहिजेत.'

राण्याने आपले मनोगत पुन:पुन्हा आकाशातील ताऱ्यांना ऐकविले. गिरीगुहांतील कणाकणांनी ते ऐकले. निसर्गाने मंद झुळकेच्या मिषाने एक सुखद श्वास टाकला. राणा मोहरला.

आणि दुसऱ्या क्षणी... दुसऱ्याच क्षणी आपल्या मुलीच्या, हृदयाचा ठाव घेणाऱ्या, रडण्याने त्या योग्याची समाधी भंग पावली. विचाराची साखळी तुटली. त्या क्रंदनाच्या दिशेने भावनावेग जोराने वाहू लागला. असंख्य यातनांना तोंड देताना जो अचल होता, आपला पराभव आपल्या डोळ्याने बघताना जो स्थिर होता तो मेरू पर्वत आपल्या मुलीच्या आक्रोशाने हेलावला. ध्येयावर दृढ असणारा ध्रुवतारा ढळला. बर्फ जसे वितळून जाते तसा त्या करुण व्यथेने राणा वितळून गेला. तत्काळ त्याने आपले आसन सोडले आणि आपल्या पर्णकुटीत प्रवेश केला.

दोन-चार मृत्तिका पात्रांच्यासह मेवाडची राणी आपल्या छोट्या मुलीला घेऊन बसली होती. वद्य पक्षात सकाळी दिसणाऱ्या चंद्राप्रमाणे तिचा चेहरा म्लान दिसत होता. मुलीच्या ओरडण्याने दु:खित झाली होती. पण जवळ काही नव्हते.

लहान मुलांची समजूत करणे सोपे नसते. त्यांना हवी असणारी गोष्ट जर त्या वेळेला ते म्हणतील तशी मिळाली नाही, तर शांत करण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ जातात.

मेवाडच्या राणीची तीच अवस्था झाली होती. छोट्या मुलीला काय हवे आहे, हे तिला माहीत होते, पण तिला ते देता येत नव्हते. ज्याच्यावर अत्यंत प्रेम आहे त्याने मागितलेली छोटीशी गोष्टही जर आईवडिलांना देता आली नाही, तर त्यांच्या हृदयाला किती यातना होत असतील याची कल्पनाच केलेली बरी! मेवाड सम्राज्ञी हताश होऊन पाहण्यापलीकडे काही करू शकत नव्हती. उदास मुद्रेने ती क्षणभर रिकाम्या भांड्याकडे आणि क्षणभर रडणाऱ्या मुलीकडे पाहत होती. पण त्या मुलीशी बोलण्याची तिची हिम्मत मात्र झाली नाही.

राणा जवळ गेला. त्याने भुकेने सुकून गेलेल्या आपल्या मुलीला मांडीवर घेतले. तिच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरविला. तिचे तोंड कुरवाळले. त्या स्पर्शात प्रेमाची स्निग्धता होती. वात्सल्याचा अर्क होता. बोलकेपणा होता. मुलीला क्षणभर बरे वाटले. दु:खात पाठीवरून फिरविलेला प्रेमळ हात दु:खाची जाणीव पुसट करतो. मुलीला हुंदके आवरत नव्हते. त्या दृश्याने राणाही भारावला. त्याच्या नेत्रांचाही बांध फुटला. एक सम्राट आपल्या मुलीच्या दु:खाने दु:खी झाला आणि आसवे ढाळू लागला. त्याने विचारले -

"बाळ! बाळ, काय झालं? का रडतेस?"

मुलीनं रडत रडत बोबड्या शब्दात सांगायला सुरुवात केली -

"पिताजी! आज ऽऽ आज मला खूप भूक लागली

आहे. तहान तर केव्हापासूनच लागली आहे. तर - आईनं मला एक ... एक भाकरीचा तुकडा दिला आणि सांगितलं, जा तिथं बस आणि खा...''

''मग!''

''मी तिथून उठले आणि इथं बसले. कोरडच्या भाकरीचा एक घास खाल्ला आणि पिताजी...तुमी शिकविलं होतं ना ते ऽऽ ते मेवाडचं गाणं म्हणत होते. माझं लक्षच नव्हतं. तोच एक मांजर आलं आणि ....''

पुढचे शब्द तिला सांगवेनात. राण्याने परत तिला थोपटले. आणि विचारले,

''मग काय झालं?''

रडत रडतच तिने वाक्य पूर्ण केले -

''आणि...आणि माझी भाकरी त्यानं पळविली...''

''बरं! आम्ही आणखी देतो. मग तर झालं ना?''

''नाही, पिताजी! आई म्हणते आता भाकरी नाही. ती काहीच बोलत नाही. नुसतंच भांड्याकडे बघत बसते आणि रडते आहे. काहीच बोलत नाही. तुम्हीच सांगा ना!''

राण्याने पत्नीकडे पाहिले. ती खाली मान घालून बसली होती. समोरची भांडी रिकामी होती आणि डोळ्यातल्या पाण्याचे थेंब झरझर खाली पडत होते. त्याने आपली नजर परत फिरविली. काय करावे त्याला कळेना. कोणत्या शब्दात उत्तर द्यावे हे त्याला समजेना. एका आज्ञेसरशी कोणतीही गोष्ट समोर उभी करण्याची ज्याची ताकद; त्याला आपल्या मुलीला भाकरीचा तुकडा देण्याकरिता इतका विचार पडावा? दैवगती किती विचित्र असते नाही? राजाला भिकारी आणि

भिकाऱ्याला राजा करणे हे तिचे खेळ! पण त्या दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडून राजाचे जे भिकारी होतात, त्यांच्या मनाचा तिनं कधी विचार केला आहे का? त्यातल्या त्यात आपल्या ध्येयाकरिता वेडे होऊन जे भिकेला लागतात, निदान त्यांच्या मनाचा जरी तिने विचार केला असता तरी तिलाच करुणा येऊन तिने हे असले चाळे बंद केले असते.

राण्याला आपल्या मुलीला काहीतरी उत्तर देणे भागच होते. बोलण्याकरिता ओठ थरथरू लागले. शब्द अडखळू लागले, तोच त्याची मुलगी म्हणाली,

"पिताजी, तुम्ही राजे आहात ना? मला माहीत आहे सारे लोक तुम्हाला महाराज म्हणतात. मी तुमची आवडती मुलगी आहे. तुम्ही राजे असून पिताजी तुम्हांला माझ्याबद्दल काहीच वाटत नाही. मला भाकरीपण तुम्ही देत नाही..."

"बाळ, काही बोलू नकोस..."

"पिताजी, मागे मी रडायला लागले की तुम्ही मिठाई देत होता. खाऊ देत होता आणि आज साधी भाकरीपण नाही.... सांगाना पिताजी..."

"बाळ..."

पुढचे राण्याच्याने बोलवेना. त्या शब्दांनी तो घायाळ झाला. मनात म्हणाला, "काय ही आमची स्थिती? लाडक्या मुलीला द्यायला घासभर रोटी नाही. कशाला आम्ही जगतो आहोत?" तोच मुलगी पुन्हा बोलू लागली,

"पिताजी,"

"हं -"

"तुम्ही का बोलत नाही मला माहीत आहे. शत्रूने

आपल्या सेनेचा नाश केला. आपल्याला वनात पाठविलं - होय ना? आई सांगत होती मला...''

राण्याने पत्नीकडे पाहिले. ती अधोवदनच होती.

''पिताजी, कोण आहे हो हा शत्रू? त्यानं मलासुद्धा वनात पाठविलं? त्याला नाही का हो लहान मुलगी? त्यानं आपल्याही मुलीला पाठवलं का हो वनात...?''

''बाळ काही बोलू नकोस...''

''सांगाना, मी लढू का त्याच्याशी? मला तलवार द्या. मी मारते त्याला. द्याना मला तलवार...''

शेवटी राण्याने तिच्या तोंडावर हात ठेवला. त्याला ते शब्द ऐकवत नव्हते. सगळीकडे निःशब्द शांतता पसरली होती. काही वेळा शब्दांच्यापेक्षा निरामय शांतताच अधिक बोलकी बनते. अधिक जाचक ठरते. हृदयाला जास्त दुःख देते. राण्याचे मन शंकांनी काळवंडले. मुलीच्या व्यथेने त्या धैर्यमेरूचा धीर खचला. तो दीन झाला. कुबेरासारखा श्रीमंत राजा आपल्या मुलीपुढे दीनाहून दीन झाला. दुःख सहन करण्यालाही काही सीमा असते. एका कक्षेपलीकडे कोणतेही दुःख सहन केले जात नाही. करायची वेळ आली तर हृदय विदीर्ण होऊन जाते. त्याचे तुकडे तुकडे होतात.

आणि मग राण्याला उदासवाण्या विचारांनी घेरले. निराशेने वेढले. खिन्नतेचे विचार त्याच्या मनात येऊ लागले.

''हे काय स्वातंत्र्य आहे की, ज्याच्याकरिता लहान लहान मुलांना भुकेने तडफडून आपली आसवं वाहावयाला लागावीत? ज्याला आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करता येत नाही तो देशाचे रक्षण काय करणार? माझ्या पराक्रमाचा

आता काही उपयोग नाही....काही उपयोग नाही. मेवाड रक्षणाची माझी प्रतिज्ञा इतक्या मोलाची खास नाही. केवळ त्या प्रतिज्ञेपायी अनेक वीरांच्या रणात आहुत्या पडल्या; स्वामीनिष्ठ चेतक मला सोडून गेला; कितीतरी सौभाग्यवतींचे कुंकू माझ्यांमुळे पुसले गेले आणि कितीतरी आयांना आपल्या मुलांचा चिरविरह सहन करावा लागला; मेवाड भकास झाला. मेवाडची ही हत्या थांबविण्याकरिता तरी मला माघार घेतलीच पाहिजे. काही वेळा पुढच्या हितावर लक्ष ठेऊन घेतलेली माघारही लाभदायक ठरते. मला तेच केले पाहिजे."

राण्याचे दुसरे मन त्याला लगेच म्हणाले, "काय! माघार..... रजपुतांनी आजपर्यंत कधी माघार घेतली नाही. आणि तू तर ध्येयनिष्ठ आहेस. रजपुतांनी आत्मार्पणं केली आहेत. आपल्या प्रत्येक रक्तबिंदूनी इतिहास घडविला आहे, पण माघार घेतली नाही. शतकानुशतके हसत हसत युद्ध खेळलेल्या मेवाडला 'माघार' हा शब्द सहनच होणार नाही. असलं पराभवाचं जिणं जगण्यापेक्षा मृत्यू काय वाईट? तुझे पूर्वज काय म्हणतील? त्यांना स्वातंत्र्य टिकविण्यासाठी काहीच श्रम पडले नसतील का? मग त्यांनी जर अनेक संकटांना तोंड देऊन इतकी वर्षे स्वातंत्र्य टिकविलं तर तेच स्वातंत्र्य पुढे टिकविणं हे तुझं कर्तव्य नव्हे का? राजा! कर्तव्यच्युत कधीही होऊ नकोस."

विचारांच्या हिंदोळ्यावर राणा सतत हेलकावे खात होता. आशा निराशेचा खेळ पाहत होता. तोच त्याला पुन्हा वाटले,

"कर्तव्यच्युत होण्याचा हा प्रश्न कोठे आहे? तात्पुरता तह करावा म्हणजे बादशहा गप्प बसेल आणि तो परत गेला की लगोलग आपलं सामर्थ्य वाढवून परत आपला

प्रदेश जिंकून घ्यावा म्हणजे स्वातंत्र्य टिकेल."

याच विचाराने त्याला घेरले. संधिपत्रच लिहावे असे त्याला सारखे वाटू लागले. नकळत त्याच्या मुखातून शब्द बाहेर पडले. "संधीपत्र!....होय, अकबराला शरणागतीचा निरोप पाठविल्याशिवाय गत्यंतरच नाही..."

राण्याचं आपल्या मुलीकडे लक्ष गेले. रडून रडून बिचारी केव्हाच झोपली होती. राण्याच्या मनातील विचाराची तिला कल्पनाही नव्हती. तिला राण्याने जवळच झोपविले.

राण्याने आपली जागा सोडली. संधिपत्राकरता कागद घेतला. तो लिहायला बसला. त्याने कागदाला लेखणी लावली नाही तोच त्याचा हात थांबविला गेला. त्याने वर पाहिले मेवाड सम्राज्ञी होती ती. तिने हळुवारपणे विचारले,

"नाथ! काय करता आहात आपण?"

राण्याचे शब्द थोडा वेळ ओठातच राहिले. अडखळले. अस्पष्ट झाले. त्रुटित झाले आणि मग एक एका अक्षराने शब्द पुरा केला. मोठ्या कष्टाने तो म्हणाला,

"पद्मावती! संधिपत्र. अकबरापुढे शरणागती..."

"आपण संधिपत्र लिहिणार? आजपर्यंत अढळ राहणारा तारा आज ढळणार? मातृभूमीची सेवा करण्याचं आपलं व्रत आहे. तिला स्वतंत्र करणं हे आपलं ध्येय आहे आणि ...."

"खरं आहे ते! पण यामुळे जर आपल्या लहान मुलांना धड खायलासुद्धा मिळणार नसेल, अन्नाच्या एकेका कणाकरता जर त्यांच्या अश्रुंच्या सरी भूमीवर पडणार असतील तर त्या सेवेचा उपयोग काय? असलं ध्येय किती दिवस

ठेवायचं? आपण दुर्बल झालो आहोत. दुर्बलांची मनोराज्यं मनातल्या मनात निर्माण होतात आणि मनातल्या मनातच विराम पावतात."

"असं का म्हणता आपण? जोपर्यंत आपलं मन कणखर आहे, त्यात जिद्द आहे, तोपर्यंत आपण कधीच दुबळे ठरणार नाही. आपली मनोराज्यं मनातच विराम पावणार नाहीत. खात्री आहे माझी. आपण मेवाडचे भाग्यविधाते आहात. आपल्याकडे डोळे लावून तर अजूनपर्यंत रजपूत स्त्रिया अभिमानानं जगत आहेत. आपणाच मेवाडचे सर्वस्व आहात. आपणाच अशी भाषा बोलायला लागल्यावर बिचाऱ्या मेवाडनं बघायचं तरी कोणाकडे?"



"म्हणून तर आजपर्यंत अठरा वर्षे आम्ही हे कष्ट सहन केले. ही दशा त्याच्याचमुळे तर निर्माण झाली आहे. पण आज वाटायला लागलं आहे की, आमची प्रतिज्ञा

एवढ्या मोलाची खास नाही की, ज्याच्याकरिता हजारो रजपुतांनी आपले प्राण द्यावेत. थोर वीरांनी आपलं बलिदान करावं आणि...''

''आणि म्हणूनच म्हणते की, आपल्याला संधी करायचा कितपत अधिकार आहे? आज अनेक आयांनी आपले पोटचे गोळे देशाकरिता दिले. कित्येक रमणींचे कुंकुमतिलक देशासाठी पुसले गेले. त्यांना एकवेळ हा अधिकार आहे. आपल्याला नाही. स्वातंत्र्याकरता ज्यांनी आपला प्राण दिला आणि आपल्याला वाचविलं ते काय अकबराशी संधी करण्यासाठी? चेतकाने आपल्या जीवाची पर्वा न करता रक्षण केलं ते काय आपण पुढं शरणागती पत्करावी याकरता? मेवाडचं रक्षण करणं आपल्याला जर जमत नसेल तर माझ्या हातात तलवार द्या मी रणचंडी बनेन. मी दुर्गामाता बनेन आणि मेवाडचं रक्षण करीन. पण आपण तहाची कल्पनाही मनात आणू नका. नाथ, नीट विचार करा आपण हे काय करीत आहात? आणि कशासाठी?...''

''पद्मावती...''

''रागाच्या भरात बोलले म्हणून क्षमा करा मला. आपल्याला टोचून बोलावं म्हणून मी बोलले नाही. पण राहवलं नाही म्हणून बोलले. चुकलं माझं!''

''पद्मावती, काय बोलतेस हे! चुकलं तुझं नाही, आमचंच चुकलं. आम्ही रागावलो नाही. साठलेली राख विस्तवावर फुंकर मारल्याशिवाय दूर जात नाही. आमचं ध्येय आम्ही विसरत चाललो होतो. आमचा मार्ग आम्ही बदलत होतो. आता तसं होणार नाही. आमचं ध्येय आम्ही निश्चित पूर्ण करू. पुन्हा आम्हाला आत्मविश्वास वाटायला लागला आहे.

शाब्बास, मेवाड साम्राज्ञी! तुमच्यासारखी राज्ञी मिळाल्यामुळे आमचं जीवन धन्य झालं आहे...खरोखर धन्य झालं आहे."

पद्मावतीच्या नेत्रातून अश्रू ओसंडत होते. एकात होते आनंदाश्रू आणि दुसऱ्यात दुःखाश्रू!

राण्याने चंद्रमौळी झोपडीतून सहज वरती पाहिले. आकाशातल्या चांदण्यांतून त्याला रजपूत वीर दिसत होते, चेतक दिसत होता. सारे सांगत होते, "ध्रुवताऱ्या, ढळू नकोस. अंतिम यश तुझंच आहे. ही कसोटीची वेळ आहे. याला सामोरा जा. प्रयत्न कर. यशश्री तुलाच माळ घालणार आहे." हा दिव्य संदेश त्याच्या कानावर आदळू लागला. क्षणभर राणाच्या चेहऱ्यावर आनंदाची छटा तरळली.

तोच पावलांचा आवाज झाला. पाचोळा पायाखाली चुरचुरला. काही भिल्ल धावतच येऊन सांगू लागले,

"राणाजी! घात झाला. शत्रूनं आपल्याला वेढलं आहे. अंधारातच दूर निघून गेलं पाहिजे."

राण्यानं क्षणाचाही विलंब लावला नाही. भुकेने रडून रडून झोपलेल्या मुलांना भिल्लांनी खांद्यावर घेतलं. भिल्लांच्या मदतीनं छपत छपत मेवाडाधिपती अंधारात दूर निघून गेला. शत्रूच्यापासून दूर! सुरक्षित जागी!!

रात्र संपत आली होती. शेवटचा प्रहर चालला होता. वाऱ्याची गती वाढली होती आणि थंडीचा कडाकाही! राणा आपल्या परिवारासह एका वृक्षाखाली उभा होता. भोवताली रक्षणाकरिता काही भिल्ल होते. विचारक्रांत झालेल्या राणाप्रतापने सांगितले,

"मघाशीच आम्ही निश्चय केला होता की, अकबराशी

लढायचं. विजय मिळवायचा. स्वातंत्र्य रक्षणाचं ध्येय गाठायचं, पण ते ध्येय आता इथं बसून गाठता येणार नाही. कारण मेवाड आम्हाला तिळभरसुद्धा सुरक्षित जागा देऊ शकत नाही. येथला प्रत्येक क्षण धोक्याचा आहे. आता पुढचे बेत आखायचे ते मेवाडच्या भूमीतून आखता येणार नाहीत. आता मेवाड आम्ही आत्ताच सोडणार आणि बाहेर राहूनच काय करता येईल ते करणार आहोत."

भिल्ल बिचारे फक्त ऐकत होते. गेली अठरा वर्षे काय थोडी परवड चालली होती? ही त्यांना माहीत होती. त्यामुळेच 'होकार' आणि 'नकार' यांच्या सीमारेषेवरच त्यांची मने रेंगाळत होती. राण्याला वेळ नव्हता. त्याने पत्नीला आणि मुलांना निघण्यास सांगितले.

राण्याचे नेत्र भरून आले. त्याने मातृभूमीकडे पाहिले. आपला मुकुट काढून तिला नमस्कार केला; पद्मावतीनेही मान खाली लववून नमस्कार केला. शब्दाशिवाय काहीतरी मागणे मागितले. रडत रडत लहान मुलीनेही आईचेच अनुकरण केले. निघण्याची तयारी झाली. पुढे वाटाडे भिल्ल, मागे राणी, आणि शेवटी राणा प्रताप! राणा मातृभूमी सोडून निघाला. तिच्या हिताकरता, तिचा त्याग करून निघाला.

रात्र जवळजवळ संपली होती. प्रभातकालचा अस्पष्ट प्रकाश पसरत होता. एक.... एक पाऊल पुढे पडू लागले. पाचोळा दबू लागला आणि पुन्हा पावलांचा आवाज झाला. जोराने पुढे येणारा. साऱ्यांच्या छातीत धस्स झाले. क्षणभर सारे थबकले. धडधडत्या हृदयाने!

काही क्षणातच ती व्यक्ती पुढे आली. "राणा प्रताप की जय" अशी घोषणा तिने केली. राण्याला कळेना की

आपण स्वप्नात आहोत की जागे? आवाज ओळखीचा वाटला. अंधुक उजेडात त्याने त्या व्यक्तीला ओळखले. तो मेवाडचा वृद्ध मंत्री होता. भामाशाह! त्याने धावत जाऊनच राणाच्या पायाला मिठी मारली. अश्रूंनी त्याचे पाय भिजविले. राणाने त्याला वर उठविले आणि विचारले,

"भामाशाह! इथं? आणि अशा वेळी?"

"राजा! तुझी सारी हकीकत मी ऐकत होतो, पण तुझा पत्ता लागत नव्हता. शत्रूच्या जबरदस्त सैन्याला चुकवून तुझ्या दर्शनाला यायला जमलंच नाही. आज मोठ्या प्रयासानं तुझ्यापाशी आलो."

त्याचं शरीर थरथर कापत होतं. थंडीतसुद्धा त्याच्या अंगातून घाम येत होता. बोलताना त्याला धाप लागली होती. काही काळ स्वस्थ बसल्यावर राण्याने पुन्हा विचारले,

"माझ्यापाशी आता काय काम आहे? मी तर आता मेवाड सोडून जात आहे. इथं राहून लढण्याची आता माझ्याकडे शक्ती नाही."

"राजा! तू मेवाड सोडणार? मेवाड सोडू नकोस. तो तुला सोडता येणार नाही. या बंदी मेबाडला, परतंत्र मातेला केवळ तुझाच आधार आहे. राजा, तुझाच आधार आहे. तूच तिला स्वतंत्र केलं पाहिजेस. त्याचकरता, माझी सेवा अर्पण करण्यासाठी मी इथं आलो आहे."

भामाशाहाने आपल्याबरोबर आणलेल्या थैल्यांचे बंद सरकावले. सोन्याची रास राण्याच्या पायावर ओतली. ती पाहताच राण्याचे डोळे चमकले. त्याच्या शरीरातून विद्युत्‌रेखा चमकून गेली. नवा उत्साह आला. चैतन्य सळसळायला लागले.

कोमेजलेला चेहरा टवटवीत झाला, ते पाहून भामाशाहाला कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. तो म्हणाला-

"राजा! माझ्या आयुष्याची सारी कमाई आज देशाच्या चरणी मी अर्पण करतो आहे. पंचवीस हजार सैनिक बारा वर्षे लढतील एवढी ही संपत्ती आहे. हिचा उपयोग कर आणि देश स्वतंत्र कर. तुझ्याभोवती उद्याची सारी सुंदर स्वप्ने मी पाहात आहे. हिचा तू स्वीकार कर."

"भामाशाह......आपली आयुष्याची कमाई, मी ती कशी घेऊ?..."

"राजा, देश जर स्वतंत्र राहिला, आपलं स्वातंत्र्य जर टिकलं तरच माझं अस्तित्व राहणार आहे. मी देशाकरता ही संपत्ती देतो आहे. योग्य माणसाच्या हाती देतो आहे. तू ध्येयनिष्ठ आहेस, तूच हिचा योग्य उपयोग करू शकशील. घे. कोणताही विचार मनात न आणता, देशाकरता ही घे."

अभिमानाने राण्याने संपत्तीच्या राशीकडे बघितले. सूर्याचे कोवळे किरण त्यावर पडले होते. सोनेरी सूर्यकिरणांनी सोन्याला शोभा आली होती का सोन्याच्या संपर्काने सूर्यकिरण शोभत होते, हे सांगता येणे कठीण होते. प्रभातकाळचे वातावरण प्रसन्न होते. नव्या दिवसाचे स्वागत सृष्टी नव्या जोमाने करीत होती. राण्यालाही प्रसन्न वाटत होते. सोनेरी किरणांनी प्रतापच्या डोक्यावर जणू मुकुट चढविला होता, आणि सांगितले होते की 'राजा, आज आम्ही तुला वनातच राज्याभिषेक करीत आहोत.' रात्र संपली होती. भाग्याची प्रभात उदय पावली आहे. दरी-दरीतून पक्षी जणूकाही मेवाडचे आणि राण्याचे विजयगीत गात होते. राण्याची नजर समोर गेली. समोर विस्तीर्ण सरोवर होते. सरोवरातील कमळे खुलली होती,

फुलली होती आणि भुंगे बंधमुक्त झाले होते.

या साऱ्या दृश्याने राण्याला नवीन उत्साह वाटू लागला. तो भामाशाहाला म्हणाला,

"भामाशाह! मेवाडची इच्छा आहे त्याचप्रमाणं होईल. आम्ही या लक्ष्मीचा स्वीकार करतो आहोत. ही लक्ष्मी मेवाडला भाग्याची ठरो. आता मेवाड लवकरच स्वतंत्र होईल यात शंकाच नाही. जगातली कोणतीही शक्ती प्रतापला त्याच्या ध्येयापासून दूर लोटू शकणार नाही. आम्ही आमचं ध्येय आता निश्चित पूर्ण करणार."

प्रतापचा निश्चय ऐकून वृद्ध मंत्र्याला आनंद वाटला. त्याच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. त्याने समोर राण्याकडे आणि राणीकडे बघितले. त्याच्याच मनाचे प्रतिबिंब त्याला दोन्ही ठिकाणी दिसले. आनंदाने राण्याचा निरोप घेऊन तो निघाला. निघताना त्याच्या चेहऱ्यावर प्रकाश आणि अंतरंगात आनंद नाचत होता. दूर जाणाऱ्या मंत्र्याकडे राण्याने अभिमानाने पाहिले. पद्मावतीकडे आणि सोन्याच्या राशीकडे, छे, भाग्यलक्ष्मीकडे त्याने कृतार्थतेने पाहिले. मस्तक खाली झुकवून वंदन केले आणि आत्मानंदातच त्याने आपल्या हातातली तलवार मेवाड रक्षणाकरता म्यानातून बाहेर काढली.

शाखा.
3003
30/10
BVBK-0403003